www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
# युवक आधार
मराठी




मुख्य संपादक - भारती आमले  उपसंपादक - श्री विलास गायकवाड  कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे  निवासी संपादक- श्री राकेश पाटील  सह संपादक - श्री मुकुंद कांबळे  महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : ३  अंक : 15  मंगळवार दि. 23 सप्टेंबर २०२५  किंमत : ४ रु  पृष्ठ : 6  RNI MAHMAR/2023/89514



अभिनव सामाजिक विकास मंडळ, गुळसुंदे यांच्या वतीने यंदाही नवरात्रौत्सवाचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले आहे. सोमवारी विधिवत पूजा करून घटस्थापना करण्यात आली. त्यानंतर देवीची मूर्ती मंगलमय वातावरणात प्रतिष्ठापित करण्यात आली. यंदा मंडळाच्या नवरात्रोत्सवाचे १६ वे वर्ष आहे.
( दैनिक युवक आधार)

## उदो बोला अंबाबाई माऊलीचा.. नवरात्रौत्सवाला सुरुवात, देवीच्या दर्शनासाठी अलोट गर्दी

आजपासून महाराष्ट्रात शारदीय नवरात्रोत्सवाला उत्साहात सुरुवात झाली आहे. आदिशक्तीच्या विविध रूपांची पूजा करण्यासाठी राज्यभरातील प्रमुख मंदिरांमध्ये पारंपरिक पद्धतीने घटस्थापना करण्यात आली. मुंबई, पुणे, धाराशिव, नांदेडसह संपूर्ण महाराष्ट्रात अनेक शहरांमध्ये नवरात्रीचा उत्साह पाहायला मिळत आहे. या निमित्ताने धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल सुरु आहे. यानिमित्ताने भाविकांमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत आहे.

पुणे शहरात नवरात्रमय वातावरण पुण्यात ग्रामदेवता श्री तांबडी जोगेश्वरी मंदिरासह शहरातील इतर मंदिरांमध्ये पारंपरिक पद्धतीने घटस्थापना झाली. यानिमित्ताने मंदिरांना आकर्षक रंगरंगोटी, फुलांची सजावट आणि विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. त्यामुळे संपूर्ण शहर उत्सवमय झाले आहे. यंदा तिथीची वृद्धी झाल्यामुळे नवरात्र दहा दिवसांचे आहे. येत्या २२ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर या काळात साजरे होणार आहे. पंचांगकर्ते मोहन दाते यांनी दिलेल्या माहितीनुसार आज पहाटे साडेचार ते दुपारी दोनपर्यंत घटस्थापनेचा मुहूर्त आहे.

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने पुण्यात श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने श्री दुर्गामाता दौडीलाही सुरुवात झाली. गेल्या ४१ वर्षांपासून संभाजी भिडे गुरुजी यांच्या नेतृत्वाखाली ही दौड काढण्याची परंपरा कायम आहे. यावर्षी दौडीची सुरुवात पाकिस्तानचा झेंडा पायदळी तुडवून करण्यात आली. पुणे पोलिसांनी नवरात्रीच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मोठी कारवाई केली आहे. गुन्हेगारी टोळ्यांना आळा घालण्यासाठी परिमंडळ १ मधील ४३ जणांना एकाच दिवशी तुरुंगात पाठवण्यात आले आहे. यामध्ये हत्यार कायद्यातील आरोपी, दारूबंदीचे गुन्हेगार आणि इतर गंभीर गुन्हेगारांचा समावेश आहे.

कुलस्वामिनी तुळजाभवानीच्या महोत्सवाला प्रारंभ महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या शारदीय नवरात्र महोत्सवाला धाराशिवमध्ये आजपासून प्रारंभ झाला. नवरात्र महोत्सवापूर्वीची मंचकी निद्रा संपवून देवी पहाटे सव्वादोन वाजता वाजतगाजत सिंहासनावर विराजमान झाली. दुपारी १२ वाजता मंदिर संस्थांचे अध्यक्ष तसेच जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते सिंहासन गाभाऱ्यामध्ये घटस्थापना करण्यात आली. या नऊ दिवसांमध्ये देवीच्या विविध पूजा मांडण्यात येणार आहेत. त्यापैकी भवानी तलवार अलंकार महापूजा भाविकांसाठी विशेष आकर्षणाचे केंद्र असते. नवरात्रीमध्ये देशभरातील ५० लाख भाविक तुळजाभवानीच्या दर्शनासाठी येण्याचा अंदाज मंदिर संस्थांनी व्यक्त केला आहे.

नांदेड आणि नाशिकमध्येही नवरात्रोत्सव माहूरगड येथे रेणुका मातेच्या नवरात्रोत्सवाला सुरुवात झाली आहे. राज्यासह देशभरातून मोठ्या संख्येने भाविक रेणुका मातेच्या दर्शनासाठी दाखल झाले आहेत. नऊ दिवस गडावर धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. यामध्ये देवीचा अभिषेक, वस्त्र आणि अलंकारांचे प्रदान, घटस्थापना, महाआरती आणि कुमारीका पूजन सोहळ्यांचा समावेश आहे.

नाशिकमधील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या सप्तशृंगी देवीच्या गडावरही भाविकांची मोठी गर्दी झाली आहे. आज नवरात्रोत्सवाची पहिली माळ असल्याने राज्यभरातील भाविक मध्यरात्रीपासूनच दर्शनासाठी येत आहेत. कोजागिरी पौर्णिमेपर्यंत सप्तशृंगी गडावर यात्रा उत्सव चालणार आहे.

मुंबईतील मंदिर भाविकांसाठी खुले मुंबईच्या मुंबादेवी मंदिरात आजपासून घटस्थापनेला नवरात्रोत्सवाला सुरुवात झाली. पहाटे ५:३० वाजता मंगल आरती करुन मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले. सकाळी ७ ते ८ वाजता घटस्थापना करण्यात आली. संपूर्ण नवरात्र काळात २१ विशेष पुजाऱ्यांमार्फत चंडीपाठ केला जाणार आहे. भाविकांच्या सुरक्षिततेसाठी बॅग स्कॅनर, सीसीटीव्ही कॅमेरे आणि १५० स्वयंसेवकांचे पथक मदतीसाठी सज्ज ठेवण्यात आले आहे.

तुळजाभवानी मातेच्या नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या संख्येने तरुण भवानी ज्योत नेण्यासाठी तुळजापुरात दाखल झाले. तुळजाभवानी मंदिरातील होमकुंडापासून प्रज्वलित केलेली ही ज्योत गावोगावीच्या शारदीय नवरात्र महोत्सवासाठी नेली जाते. यानंतर पुढील नऊ दिवस ती अखंड तेवत ठेवली जाते.

## रखडलेला रस्ता पूर्णत्वासाठी महाविकास आघाडीकडून बेशरम झाडे लावा आंदोलन




**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**
मुखेड दि.मुखेड शहरातील बाऱ्हाळी नाका परिसरात महामार्गावरील अर्धवट रस्ता पूर्ण करा या मागणीसाठी महाविकास आघाडी मुखेडच्या वतीने अनोखे बेशरम लगाव आंदोलन करण्यात आले.

मुखेड महाविकास आघाडी काँग्रेस,शिवसेना ऊ.बा.ठा,राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट कडून शहरातील बा ऱ्हाळी नाका लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकातील रस्त्याची अत्यंत दयनिय अवस्था होऊन नागरिक व वाहनधारकांना होणारा त्रास पाहता शासन व प्रशासनाच्या विरोधात राज्याचे सार्वजनिक मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना तहसिलदार मुखेड मार्फत निवेदन सादर करून चौकात बेशरम झाडे लावा आंदोलन करण्यात आले.

2018 पासून चालू असलेल्या नांदेड मुखेड बिदर महामार्गातील बाऱ्हाळी नाक्यावरील मुखेड - बाऱ्हाळी रोड व शहरातील काही भागात मुख्य रस्त्याने नर्सी - लातुर रोड या पुर्वी के.टी. कन्स्ट्रक्शनने कामे अर्धवट अवस्थेत सोडुन दिले. परत पुन्हा जोगदंड कन्स्ट्रक्शनने सुद्धा पुन्हा मोठया बडया व्यक्तीच्या सांगण्यावरून जाणीवपुर्वक जैसे थे ची परिस्थिती कायम ठेवल्यामुळे शहरातील या भागातील नागरीकांना, व्यापाऱ्यांना व वाहनधारकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे म्हणुन चौकातील अर्धवट कामे पुर्ण करण्यात यावीत यासाठी सा.बां.वि.मुखेड व संबंधीत वरीष्ठ कार्यालयाला काँग्रेसकडून वेळोवेळी लेखी व तोंडी सुचना देऊनही नागरीकांच्या जीवाशी व आरोग्याशी खेळण्याचा प्रकार दिसुन येत आहे.

आजच्या रस्ता दरबार दिनी शासन व प्रशासनाला पुन्हा जागे करण्यासाठी मुखेडच्या महाविकास आघाडीकडून मुखेड - कंधार विधानसभेचे मा.आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांच्या सुचनेनुसार महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे महासचिव भारतयात्री डॉ.श्रावण रॅपणवाड,शिवसेना ऊ.बा. ठा.तालुकाप्रमुख उमेश पाटील आडलुरकर,काँग्रेस शहराध्यक्ष हणमंत नारनाळीकर,शिवसेनेचे शहरप्रमुख शंकरराव चिंतमवार,राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष सुनिल पान २ वर

## महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३८ वी जयंती सोहळ्याचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर** : रयत शिक्षण संस्थेचे, महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल येथे महाराष्ट्राचे थोर शिक्षणमहर्षी व रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक "पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३८ वी जयंती सोहळा २४ सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास अध्यक्ष म्हणून रयत शिक्षण संस्थेचे मैनेजिंग कौन्सिलचे सदस्य रामशेठ ठाकूर हे असून प्रमुख पाहुणे म्हणून, रयत शिक्षण संस्थेचे माजी सहसचिव (उच्च शिक्षण) डॉ. डी. डी. पाटील, रायगड विभागीय सल्लागार समितीचे चेअरमन बाळाराम पाटील हे उपस्थित राहणार आहेत. सदर सोहळा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य जे. एम. म्हात्रे, अरुण भगत, महेंद्र घरत आदि मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गणेश ठाकूर यांनी दिली आहे.



शिक्षण महर्षी, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांना आपले आदर्श मानून शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेले रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त पनवेल शहरातील डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळयास पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले. त्यांच्यासह यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, वाय. टी. देशमुख, प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, सौ. शकुंतला ठाकूर विद्यालयाचे चेअरमन परेश ठाकूर यांच्यासह इतर रयत सेवकांनी कर्मवीरांना अभिवादन केले.
( दैनिक युवक आधार )

## तनाएराचे नवे फेस्टिव्ह कलेक्शन 'मियारा'

### विशेष ऑफर्स आणि अनोखी खरेदी योजना ग्राहकांना मिळवून देणार स्वप्नपूर्तीचा आनंद

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई/ पनवेल (प्रतिनिधी)**
महिलांचा एथनिक वेयर ब्रँड आणि टाटा परिवारातील एक सदस्य, तनाएराने प्रस्तुत केले आहे नवे फेस्टिव्ह कलेक्शन 'मियारा' हाताने विणलेले आणि शुद्धतेमध्ये रुजलेले हे कलेक्शन आधुनिक महिलांसाठी तयार केले आहे. आधुनिक डिझाईन आणि पारंपरिक कला यांच्या अप्रतिम विणीतून एक आगळीवेगळी डिझाईन भाषा तयार होते जी या कलेक्शनला इतरांपेक्षा वेगळे स्थान प्रदान करते. विविध प्रकारचे रेशीम आणि सूत, विविध विणकाम परंपरा 'मियारा' मध्ये पाहायला मिळतात. स्वतःची आवड, स्वप्ने पूर्ण करण्यासाठी असो किंवा एखाद्या प्रिय व्यक्तीला विचारपूर्वक दिलेली भेट असो, आनंद आणि उत्साहाचा प्रत्येक क्षण शानदार व संस्मरणीय बनावा ही यामागची भावना आहे.

'मियारा' सोबत सणांचा आनंद द्विगुणित करा, या साड्यांची किंमत ६४९९ रुपयांपासून पुढे आहे, स्वतःसाठी खास खरेदी म्हणून, विचारपूर्वक दिलेली, कायम लक्षात राहील अशी भेट म्हणून या साड्या अतिशय योग्य आहेत. अनुभव मिळवण्याचे आणि हाताने विणलेल्या साड्या स्वतःच्या वॉर्डरोबमध्ये सामील करण्याचे नवे मार्ग तनाएराने प्रस्तुत केले आहेत. लवकरात लवकर भेट द्या - तनाएरा शोरूम - इनॉर्बिट मॉल, वाशी, नवी मुंबई.

वर्षातील सर्वात मोठे सण जवळ येत आहेत, त्यांना अनुसरून तनाएराने आपले नवे कॅम्पेन देखील तयार केले आहे, 'द गिफ्ट ऑफ प्युअर लव्ह', सणासुदीच्या काळात साडी म्हणजे कालातीत प्रेमाचे प्रतीक असा साडीचा सन्मान या कॅम्पेनमध्ये करण्यात आला आहे. प्रत्येक खरेदी हा एक अनुभव बनावा आणि तो कायम स्मरणात राहावा यासाठी ब्रँडने विशेष फेस्टिव्ह ऑफर्स सुरु केल्या आहेत, यामध्ये गिफ्ट व्हाउचर्स आणि गोल्ड कॉईन्स आहेत. पान २ वर



## मोहटा देवी चॅरिटेबल ट्रस्ट, पनवेल (रजि.) तर्फे शारदीय नवरात्री उत्सवाचे भव्य आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल /आण्णासाहेब आहेर**
भक्ती, श्रद्धा व सांस्कृतिक मूल्यांचा संगम साधत मोहटा देवी चॅरिटेबल ट्रस्ट, पनवेल (रजि.) यांच्या वतीने मोहटा देवी (रेणुका माता) जागृत देवस्थानात शारदीय नवरात्री उत्सवाचे भव्य आयोजन सेक्टर -५,शंकर मंदिर जवळ न्यू पनवेल येथे करण्यात आले आहे नवरात्र हा देवीच्या उपासनेचा व शक्तीच्या पूजनाचा महापर्व असून,यंदाही २२,सप्टेंबर पासून नवरात्रीचे नऊ दिवस मंदिर परिसर भक्तिमय वातावरणात साजरे होणार आहेत.

नवरात्रीच्या प्रारंभदिनी सकाळी महाअभिषेक,घटस्थापना व देवीची विशेष पूजा-अर्चा यांद्वारे उत्सवाचा शुभारंभ होणार आहे. दररोज सकाळ-संध्याकाळ श्री रेणुका मातेस महाआरती, नित्यपूजा,भजने होणार आहेत,स्थानिक कलाकार व वारकरी संप्रदाय मंडळी यांच्या सहभागाने भक्तांना अध्यात्मिक अनुभव मिळणार आहे.

उत्सवाचे विशेष आकर्षण :दररोज सकाळी कुमारी पूजन व दुर्गा सप्तशती पठण,संध्याकाळी महाआरती,देवीच्या चरणी भजने,देवी वर भक्तीमय गाणी गायनातून मंदिरात भक्तीभावाचे आयोजन,विजया दशमीला भव्य पालखी सोहळा व देवीचे विसर्जन

भक्तांच्या सोयीसाठी मंदिर परिसरात आवश्यक सोयी-सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून देवीच्या दर्शनाचा लाभ घ्यावा,असे आवाहन मोहटा देवी चॅरिटेबल ट्रस्ट,पनवेल (रजि.)चे अध्यक्ष संतोष आमले यासह कमिटीच्या तर्फे करण्यात आले आहे.




## पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर त्रिशताब्दी जयंतीनिमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आणि पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**
पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त आयोजित भव्य राज्यस्तरीय निबंध स्पर्धा अंतर्गत निवडक निबंधांचे पुस्तक प्रकाशन, पारितोषिक वितरण आणि आदर्श विद्यारत्न पुरस्कार सोहळा उत्साहात व यशस्वीरित्या पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यानंतर निबंध संग्रहाचे प्रकाशन आणि विजेत्या विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा पार पडला. कार्यक्रमास विविध मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली, त्यामध्ये प्रशांत ठाकूर (आमदार, पनवेल), अविनाश कोळी (जिल्हाध्यक्ष, भाजपा उत्तर रायगड),. धनराज विसपुते (चेअरमन, आदर्श शैक्षणिक समूह), डॉ. प्रशम कोल्हे (संयोजक, शिक्षक आघाडी), महेंद्र विसपुते व
संगीता विसपुते (संचालक, आदर्श शैक्षणिक समूह) यांची उपस्थिती होती.



या प्रसंगी राज्यभरातील शिक्षक, प्राचार्य, विद्यार्थी व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला व्यासपीठ मिळाले आणि अहिल्याबाईंच्या कार्याचे स्मरण जागवले गेले.

# कर्तव्य आणि माणुसकीची जुळवणूक अंभोरा पोलिस ठाण्याचा आदर्श उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी**
**बाळासाहेब रकटाटे**

मुसळधार पावसामुळे गेल्या काही दिवसांत तालुक्यातील अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले. घरातील धान्य, कपडे, जनावरे आणि घरातील वस्तू पाण्याखाली गेल्याने शेतकरी व कुटुंबांना अक्षरशः हतबल परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. गावोगावी पूरग्रस्तांचे अश्रू पुसण्यासाठी अनेक संस्थांचा पुढाकार सुरू आहे. त्यातच अंभोरा पोलिस ठाण्याने एक वेगळा व आदर्शवत उपक्रम हाती घेतला असून, नागरिकांच्या मनात पोलिसांबद्दलचा विश्वास व माणुसकीची जाणीव आणखी दृढ केली आहे वर्दीतील माणुसकीचे दर्शन

अंभोरा पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांनी पूरग्रस्त कुटुंबांना जीवनावश्यक साहित्य, धान्य व कपड्यांचे वाटप करून मदतीचा हात दिला. साधारणपणे पोलिस म्हणजे फक्त कायदा व सुव्यवस्था राखणारे, गुन्हेगारांना पकडणारे आणि कायद्याची अंमलबजावणी करणारे अशी जनसामान्यांची धारणा असते. परंतु या उपक्रमातून पोलिस हे केवळ शिस्त व कायद्याचे रक्षक नसून, कठीण प्रसंगी माणुसकीची उब देणारे आधारस्तंभही आहेत, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले.अधिकाऱ्यांची उपस्थिती या उपक्रमात



सहायक पोलिस निरीक्षक मंगेश साळवे, उपनिरीक्षक चंद्रकांत तावरे, देविदास सातव आदिनाथ भडके यांच्यासह पोलिस कर्मचारी व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. केवळ मदत वाटप न करता त्यांनी नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. "सरकारकडून मिळणारी मदत नक्की येईल, पण पोलिस म्हणून आम्हालाही आपले दुःख हलके करण्याची जबाबदारी आहे" असे आश्वासन अधिकारी वर्गाने दिले.कर्तव्याबरोबर माणुसकी' – अंभोरा ठाण्याची वेगळी ओळख

अंभोरा पोलिस ठाणे हे विविध सामाजिक उपक्रमांमध्ये अगोदरपासूनच आघाडीवर आहे. गावसुरक्षा, सायबर जनजागृती, वाहतूक सुरक्षितता असे अनेक उपक्रम राबविणारे हे ठाणे आता पूरग्रस्तांना दिलेल्या मदतीमुळे 'कर्तव्याबरोबर माणुसकी' जपणारे ठाणे म्हणून सर्वदूर दखल घेत आहे.

सामाजिक जबाबदारीचे उदाहरण हा उपक्रम केवळ मदतीपुरता मर्यादित न राहता, समाजासमोर सामाजिक जबाबदारीचे नवे उदाहरण ठरला आहे. वर्दी घातलेले पोलिस कधी कठोर भासतात, पण आज त्याच वर्दीतून ओसंडून वाहणारी माणुसकी गावकऱ्यांना दिलासा देऊन गेली.

अशा प्रकारे अंभोरा पोलिस ठाण्याचा हा उपक्रम केवळ मदतकार्य नसून, पोलिस व नागरिक यांच्यातील विश्वासाचे नवे बंध तयार करणारा ठरला आहे.

# दसऱ्याच्या स्वागताआधीच अवकाळी पावसाचा तडाखा : शेतकऱ्यांच्या हातचा घास हिरावला





**दैनिक युवक आधार**
**बीड, आष्टी प्रतिनिधी – मारुती सत्रे**

दसऱ्याच्या स्वागताची तयारी बळीराजा करत असतानाच निसर्गानेच शेत व घराची साफसफाई केली आहे. आष्टी तालुक्यासह संपूर्ण राज्यभर अवकाळी अतिवृष्टीचा जोरदार तडाखा बसला असून शेतकरी हतबल झाला आहे.

अवकाळी पावसामुळे उडीद, कांदा, सोयाबीन, कापूस, बाजरी यांसारख्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. आधीच शेतमालाला कवडीमोल दर मिळत असताना हातात आलेला घासही या पावसाने हिसकावून घेतला. शेतमालाबरोबरच जनावरे वाहून गेली, शेतकरी कुटुंबाचे घरसुद्धा पडझडीत सापडले असून घरातील सामानही वाहून गेल्याच्या घटना समोर येत आहेत.

दरम्यान, बाजारात सफरचंद, पेट्रोल, डिझेल, सोनं, चांदी तसेच सिनेमागृहातील तिकीट दर झपाट्याने वाढत असताना आमदार–खासदार–मंत्र्यांचे पगार सातत्याने वाढलेले दिसतात. मात्र, शेतकऱ्याच्या पिकांना मात्र योग्य दर मिळत नाही, ही एक गंभीर शोकांतिका असल्याचे ग्रामस्थांचे मत आहे. काही लोकप्रतिनिधी स्वतःच्या मुलांसाठी विदेशी गाड्यांची खरेदी करण्यास मागेपुढे पाहत नाहीत; पण शेतकऱ्याचा प्रश्न मात्र नेहमीच दुय्यम राहतो.

कांदा किंवा इतर शेतमालाला थोडाफार भाव वाढला तरी शासनस्तरावर मोठा आरडाओरडा होतो. उलट शेतकरी मात्र स्वतःचे घर चालवणे, मुलांचे शिक्षण, शेतीचा वाढता खर्च, कर्जफेड आणि मुला–मुलींच्या लग्नाचा विचार करताना आर्थिक अडचणीत सापडतो. कर्जाचा डोंगर एवढा वाढतो की काही शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त होतात, ही वेदनादायी वस्तुस्थिती आहे.

अवकाळी पावसामुळे शेतमाल व जनावरांचे झालेल्या मोठ्या प्रमाणातील नुकसानीचे पंचनामे करून तातडीने मदत देण्याची मागणी शेतकरी आणि सामान्य नागरिकांकडून होत आहे.

## विशेष ऑफर्स आणि अनोखी खरेदी योजना ग्राहकांना मिळवून देणार स्वप्नपूर्तीचा आनंद

**पान १ वरून** मर्यादित कालावधीच्या या ऑफरचा लाभ २० ऑक्टोबर २०२५ पर्यंत घेता येईल. देणे ही केवळ घटना बनून राहू नये, यासाठी तनाएराने आपली गोल्डन ककून खरेदी योजना सुरु केली आहे, त्यामुळे ग्राहकांना त्यांच्या स्वप्नातील साडी प्रत्यक्षात परिधान करण्याचे सुख मिळवता येते.

तनाएराचे सीईओ श्री अंबुज नारायण म्हणाले, "यंदाच्या सीझनसाठी आम्ही प्रस्तुत केलेले मियारा कलेक्शन हे कल्पनेचे आणि वैविध्यपूर्ण विणकामातून प्रदर्शित होणाऱ्या वारशाचे प्रतिबिंब आहे. तनाएरामध्ये आम्ही असे मानतो की, साडी ही फक्त परिधान केली जात नाही तर अनुभवली जाते. साडी कोणत्याही सोहळ्याला तुमचा स्वतःचा समारंभ बनवते, तुमच्या भेटवस्तूंना शुद्ध प्रेमाचे प्रतीक बनवते. हीच भावना आम्ही आमच्या फेस्टिव्ह कॅम्पेनमधून मांडली आहे.

## रखडलेला रस्ता पूर्णत्वासाठी महाविकास आघाडीकडून बेशरम झाडे लावा आंदोलन

**पान १ वरून** मुक्कावार यांच्या नेतृत्वाखाली बाऱ्हाळी नाक्यावर प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी चौकात बेशरमाची झाडे लाऊन अनोखे आंदोलन महाविकास आघाडीने केले

प्रशासनाच्या गैरसोईच्या कारभाराबद्दल निषेध व्यक्त करून तात्काळ कार्यवाही न झाल्यास अजुन तिव्र आंदोलन करण्यात येईल असे आपल्या भाषणातून पदाधिकाऱ्यांनी रोष व्यक्त केला. या आंदोलन प्रसंगी तालुका काँग्रेस कार्याध्यक्ष संभाजी पाटील उन्द्रीकर, युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष जयप्रकाश कानगुले,युवासेना शहरप्रमुख योगेश मामिलवाड,जिल्हा सेवादल उपाध्यक्ष विद्याधर अण्णा साखरे,अल्पसंख्यांक सेल शहराध्यक्ष ईमराण पठाण,मागासवर्गीय सेल शहराध्यक्ष बालाजी साबणे,ओ.बी.सी.सेल शहराध्यक्ष प्रकाश निमलवाड,युवक काँग्रेस तालुका उपाध्यक्ष एम.आर. गोपणर,काँग्रेस उपाध्यक्ष शिवाजी गायकवाड,सोशल मिडीया विभाग शहराध्यक्ष केतन मामडे,उद्योग सेल शहराध्यक्ष बाळासाहेब आकुलवाड,अल्पसंख्यांक सेल तालुका उपाध्यक्ष सय्यद,व्ही. आर.शेख,हाफीज पठाण, शिवसांब येरमुनवाड सह

महाविकास आघाडीच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. या निवेदनाच्या प्रति खा.प्रा.रविंद्रजी चव्हाण,मा.आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता नांदेड,बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता, उपअभियंता बांधकाम विभाग मुखेड यांना देण्यात आलेल्या आहेत.

# क्रीडा सह्याद्री चा खेळाडू वेदांत पडोळ याला राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेमध्ये सुवर्णपदक

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशन व उत्तर प्रदेश टेनिस क्रिकेट असोसिएशन आणि मथुरा जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने सातवी राष्ट्रीय 17 वर्षे आतील टेनिस क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धा मथुरा येथील

हार्शी राघव क्रिकेट ग्राउंड, मथुरा (उ.प्र.) येथे उत्साह संपन्न झाली त्यामध्ये निफाड येथील क्रीडा सह्याद्रीचा खेळाडू वेदांत सचिन पडोळ यांनी उत्कृष्ट खेळ करत महाराष्ट्राला स्वर्णपदक मिळवून दिल्याबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे

या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी आंतरराष्ट्रीय टेनिस क्रिकेट फेडरेशनचे अध्यक्ष कन्हैया



गुज्जर तसेच भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महासचिव सौ मीनाक्षी गिरी ,महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महिला अध्यक्ष धनश्री गिरी, इत्यादी उपस्थित होते. वेदांत पडोळ हा क्रीडा सह्याद्री क्लब मध्ये पाच वर्षापासून प्रॅक्टिस करत होता . या प्रॅक्टिसच्या जोरावर त्याची महाराष्ट्र संघामध्ये बॅटमॅन म्हणून निवड झाली होती त्यांनी महाराष्ट्र संघात उत्कृष्ट खेळ करत महाराष्ट्र संघाला सुवर्णपदक मिळून दिले तसेच राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेमध्ये वेदांत पडोळ सुवर्णपदक मिळाले व महाराष्ट्र संघाचा प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल क्रीडा सह्याद्री फाउंडेशनचे अध्यक्ष विलास गायकवाड सदस्य क्रीडा सह्याद्री फाउंडेशनचे , उपाध्यक्ष रमेश वडघुले ,विनोद गायकवाड, चेतन कुंदे,दत्तू रायते ,,प्रतीक्षा कोटकर, अनिता बनकर,विजय घोटेकर , कीर्ती कोटकर, श्याम चौधरी, लखन घटमाळे,संदीप बोरसे यांनी सर्वांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा द्या..क्रीडा मार्गदर्शक विलास गायकवाड यांचे त्याला मार्गदर्शन लावत आहे

# एशियन सिड्सचे बियानाने शेतकऱ्यांना दिलासा

**दैनिक युवक आधार**
**किनवट प्रतिनिधी . दिलीप भालेराव**

किनवर तालुक्यामध्ये अनिवृष्टी झाल्यामुळे 90% शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे परंतू गणेशराव नारायण देवराये पाटील रा ठाकरवाडी यांनी एशियत सिड्स प्रा ली चि कृषी गोल्ड 151 ही वराईटी पेरल्यामुळे त्यांच्या तेवढे शेतामध्ये सोयाबीन पिक चांगल्यापैकी आहे. म्हणून एशियन कंपनीचे प्रतिनिधी दयानंद थोटे मो 7030667723 व नरेरा बोतेवाड मो 8888924591 यांनी गणेशराव नारायण देवराये पाटी यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. या वेळी शेतकरी शिवाजी किरवले ,देविदास भालेराव ,सतीष लोखंडे ,माधव चांदोडे ,मलकोजी खोकले ,देविदास ढोले ,तुकाराम बोथिंगे, सुरेश भालेराव ,बालाजी फोले ,असे बरेच शेतकरी उपस्थित होते.



# शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्या

## नेवासा काँग्रेस व शेतकरी संघटनेकडून शासनाकडे मागणी

**दैनिक युवक आधार**
**नेवासा प्रतिनिधी :- लखन वाल्हेकर**

नेवासा तालुक्यात झालेली अतिवृष्टी व यामुळे झालेले शेतीचे नुकसान यासंदर्भात काँग्रेस व शेतकरी संघटनाचे पदाधिकारी यांनी नेवासा तहसीलदार यांना भेटून पीक पाहणी, पंचनामे या भानगडीत न पडता तालुक्यातील सर्वच शेतकऱ्यांना सरसकट नुकसान

शेकऱ्यांना कर्जमाफी नाही, पिकांना हमीभाव नाही,कांद्याला भाव नाही, अनुदान नाही, कपाशीचे उभे पीक वाया गेले आहे, शेतकरी आत्महत्या वाढत आहे. हे दिसत असून सरकार झोपेचे सोंग घेत आहे. आता वेळ आली शेतकऱ्यांना एकजूट होऊन लढण्याची– अंजुम पटेल शहराध्यक्ष नेवासा काँग्रेस.

भरपाई देण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे केली. यावेळी नेवासा तहसीलदार यांच्याशी चर्चा करताना नेवासा तालुक्यात सर्वच मंडळामध्ये अतिवृष्टी झालेली असल्याचे निदर्शनास आणून देत यामुळे सर्वच शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. सर्वच शेतकऱ्यांना अतिवृष्टीचा मोठा फटका बसला असून कोणताही शेतकरी आता नुकसान भरपाई पासून वंचित राहू नये याची दक्षता घेण्यात यावी असे स्पष्ट केले. यासाठी शासनाने पिकानुसार व क्षेत्रानुसार सरसकट भरपाई द्यावी अशी मागणी काँग्रेस व शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली. यावेळी शेतकरी संघटनेचे त्र्यंबक भदगले यांनी सध्याची स्थिती पाहता या आपत्कालीन परिस्थितीत सरकारने तातडीने शेतकऱ्यांना मदत जाहीर करावी व शेतकऱ्यांना या अस्मानी संकटातून वाचवावे. अशी मागणी केली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी दिवसेंदिवस शेतकऱ्याच्या आत्महत्या वाढत आहे परंतु शेतकऱ्यांकडे सरकारला डोकून पाहिलाही वेळ नाही. शासनाने त्वरित कर्जमाफी करावी व संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने जर मदत घोषित नाही तर शेतकऱ्यांचे मोठे आंदोलन उभारणार. यावेळी शहर काँग्रेसचे अध्यक्ष अंजुम पटेल, भारतीय स्वाभिमानी संघाचे गणपत मोरे, काँग्रेसचे सतीश तऱ्हाल, शेषराव गव्हाणे, आदीसह शेतकरी उपस्थित होते.

# विंचूरमध्ये पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

## शैक्षणिक व सामाजिक कार्याचा पाठपुरावा करण्याचा संदेश

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**विंचूर** : रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक व पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३८ वी जयंती कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, विंचूर येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील अमूल्य योगदानाची स्मृती जपत, भावी पिढीला प्रेरणा देण्यासाठी आयोजित केलेल्या या कार्यक्रमात गावकरी, पालक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

या कार्यक्रमादरम्यान फुलांनी सजवलेल्या ट्रॅक्टरवरील कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन स्थानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष जगदिश जेऊघाले,रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य



डॉ.सुजित गुंजाळ व रयत शिक्षण संस्था उत्तर विभागीय सल्लागार समितीचे सदस्य सुनिल मालपाणी यांच्या हस्ते पार पडले. यावेळी स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य पंढरीनाथ दरेकर,स्थानिक स्कूल कमिटी सदस्य अनिल दरेकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजेंद्र गोरे, उपाध्यक्ष सोमनाथ निकम यांसह इतर मान्यवर, पालक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यालयाच्या गीत मंचाने रयत गीत सादर केले. त्यानंतर फुलांनी सजवलेल्या रथातून कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक गावातून काढण्यात आली. या मिरवणुकीदरम्यान विद्यार्थ्यांनी लेझीम, ढोल, ताशा, नृत्य, पथनाट्य, झांज पथक यासह विविध सादरीकरणे केली. समाजसुधारक, जलव्यवस्थापन, गणितीय संशोधन, आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन, रस्ते सुरक्षा,क्रांतिकारक, सर्वधर्मसमभाव, स्त्री–पुरुष समानता, संत, स्वच्छता अभियान, वारकरी, साईबाबा, दांडी यात्रा, वृक्षदिंडी, भजनी मंडळ, सैनिकी देखावा, तंबाखूमुक्ती, साक्षरता, अंधश्रद्धा निर्मूलन, बेटी बचाव, जागरण–गोंधळ या विषयांवर आधारित देखावे सादर करून विद्यार्थ्यांनी सर्वांची मने जिंकली.

तसेच, विद्यार्थ्यांनी आदिवासी नृत्य, पावरी नृत्य, टिपरी नृत्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित गीत, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज व त्यांची मावळे यासारखे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. मिरवणुकीनंतर विद्यार्थ्यांना भोजन देण्यात आले.

या कार्यक्रमासाठी ट्रॅक्टर रथ उपलब्ध करून देणाऱ्या पालकांचे विद्यालयाच्या वतीने प्राचार्य नंदकुमार देवढे यांनी आभार मानले. उपमुख्याध्यापक सुरेश वाबळे, पर्यवेक्षक सुदाम माळी, लाइफ मेंबर राजेंद्र चांदे, प्राथमिक विद्यामंदिराच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिरसाठ यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी विनायक जेऊघाले, राजाराम दरेकर, दिनकर चव्हाण, ज्ञानेश्वर गाडे, पी.के. जेऊघाले, ढवण सर, सोनाली कापडणीस, सोमनाथ दरेकर, राजेंद्र क्षीरसागर, कडू पाटील, सति श शेलार, मुकुंद आभाळे, रवींद्र सानप, महेश जोशी, मधुकर दरेकर, महेंद्र मस्कर, भूषण चव्हाण, संजू जोशी, सुमनताई दरेकर, भागवत जाधव, विजय शेवाळे, युवराज दरेकर, स्वाती धात्रक, मीरा दरेकर, स्नेहल साळी, आरती जाधव, वर्षा वाघ, मालती जाधव, बागुल सर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# विक्रोळी हनुमान नगर सोसायटी येथील धोकादायक नाल्याचे काम त्वरित सुरू करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**विक्रोळी,(केतन भोज);**

हनुमान दर्शन हनुमान नगर सोसायटी पार्कसाईट,विक्रोळी पश्चिम येथे असलेला मोठा धोकादायक नाला पूर्णपणे खचला असून या नाल्याला पूर्णपणे तडे गेले आहेत.त्यामुळे हा नाला कोणत्याही स्थितीत कोसळण्याची शक्यता आहे.येथील विविध स्थानिक सोसायट्यांना जोडणाऱ्या या नाल्यावरून रोज हजारो लोक येजा करत असतात. तसेच जवळच याठिकाणी शाळा देखील आहेत.त्यामुळे शाळकरी विद्यार्थी ही याठिकाणांहून जात येत असतात.तसेच हा मुख्य मोठा नाला संपूर्णरित्या खचला असून तो कधीही कोसळू शकतो.तसेच संबंधित मनपा एन विभागाचे अधिकारी यांनी या धोकादायक नाल्याची पाहणी देखील केली आहे.वांरवार या संबंधित पाठपुरावा करून देखील अद्याप ही काम सुरू न झाल्यामुळे मनपा एन विभाग हे याठिकाणी कोणती जीवितहानी होण्याची वाट बघत आहे का?असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक विचारत आहेत.त्यामुळे लवकरात लवकर संबंधित मनपा एन विभागाने या नाल्याचे बांधकाम सुरू करावे अशी मागणी येथील स्थानिक नागरिक व सामाजिक कार्यकर्ते प्रवीण धुमाळ,तुषार निर्मल,किशोर चौनाल यांनीही केली आहे.



**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू की प्रशासकीय दुर्लक्षामुळे बळी?" - माहिती अधिकार समितीकडून हिंगणघाटच्या नायब तहसीलदारांवर कारवाईची मागणी.

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्स्ना करवाडे**
**हिंगणघाट, वर्धा:**
शेतजमिनीच्या बांधाच्या वादातून एका ७५ वर्षीय वृद्धाच्या मृत्यूने हिंगणघाट तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणातील पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्याऐवजी, प्रशासकीय यंत्रणेनेच आरोपींना संरक्षण दिल्याचा धक्कादायक आरोप माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलीसमित्र समितीने (MAPSPS) केला आहे. विशेष म्हणजे, या मृत्यूसाठी समितीने थेट नायब तहसीलदार एम. एस. भलावी यांना जबाबदार धरले आहे.

**काय आहे नेमके प्रकरण?**
छोटी आर्वी, ता. हिंगणघाट येथील रहिवासी लक्ष्मीकांत दुगे (वय ७५) यांचा त्यांच्या शेजारच्या वासुदेव आणि सुरेश आदमाने या पिता-पुत्रासोबत शेतजमिनीच्या बांधावरून अनेक दिवसांपासून वाद सुरू होता. वारंवार होणाऱ्या अर्वाच्य भाषेचा वापर, अपमान, धमक्या आणि मानसिक खच्चीकरण यामुळे पीडित लक्ष्मीकांत दुर्गे पूर्णपणे खचले होते. या प्रकरणी नायब तहसीलदार यांच्यासमोर दोन्ही पक्षांना बोलावण्यात आले होते. २३ जानेवारी २०२५ रोजी नायब तहसीलदार यांनी आदेश पारित केला होता, त्यात आदमाने पिता-पुत्रांनी त्यांचा बांध खोदून वाद मिटवण्याचे तोंडी आश्वासन दिले असे स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले होते.
परंतु, या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही. उलटपक्षी, आदमाने पिता-पुत्रांनी अरेरावीची भाषा वापरत दुर्गे यांना धमकावले. या सततच्या मानसिक छळामुळे आणि प्रशासनाकडून न्याय मिळत नसल्यामुळे अखेर २० जुलै २०२५ रोजी लक्ष्मीकांत दुर्गे यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

**प्रशासकीय भूमिकेवर प्रश्नचिन्ह**








या दुर्दैवी घटनेनंतर, माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलीसमित्र समितीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष महेश सारणीकर, विदर्भ विभागीय महिला संघटक सौ. ज्योत्स्ना करवाडे, तसेच प्रतिनिधी महेश पेन्दोर आणि जितेंद्र खोडे यांनी नायब तहसीलदारांची भेट घेतली. यावेळी, नायब तहसीलदारांची भूमिका पक्षपाती असल्याचा आणि ते विरोधी पक्षासोबत "साटेलोटे" करत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. एकंदरीत झालेल्या चर्चेत केलेला आरोप सत्य असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे, असेही मत ठामपणे मांडण्यात आले आहे.
सौ. ज्योत्स्ना करवाडे यांनी तक्रारीत म्हटले आहे की, "ज्या अधिकाऱ्यांनी न्याय द्यायचा आहे, तेच या गुन्ह्यातील प्रत्यक्ष साक्षीदार आणि गुन्हेगार ठरतात. त्यांच्या दुर्लक्षामुळेच या वृद्धाचा जीव गेला. "या घटनेनंतर संबंधित अधिकारी 'साधे पत्रकारांशी देखील नीट वागत आणि बोलत नाहीत, तर सामान्य माणसाची काय स्थिती असेल?' असा संतप्त सवालही त्यांनी उपस्थित केला.

**मुख्य मागणी**
समितीने 01 एप्रिल 2025 रोजी दिलेल्या पत्रात नमूद करण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या गोष्टींचा प्रशासनाने गंभीरपणे विचार करणे आवश्यक असतांना देखील, विचार झाला नाही, एवढेच काय तर, संबंधित पत्राला आजपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांनी उत्तर देखील दिलेले नाही, समितीने पत्रात स्पष्टपणे नमूद केलेले सर्व धोके संबंधित नायब तहसीलदार यांच्या गलथान, एककल्ली आणि पक्षपाती भूमिकेमुळे प्रत्यक्ष घडलेले आहेत, पीडित कुटुंबियांची जीवित, वित्त, मानसिक आणि शारिरीक हानी झालेलीच आहे, त्या कुटुंबाला त्यांचा घरातला वृद्ध व्यक्ती गमवावा लागला आहे, लक्ष्मीकांत दुर्गे यांच्या मृत्यूला जबाबदार असलेल्या प्रत्येक प्रशासकीय अधिकारी, आणि विरोधी पक्षातील वासुदेव आदमाने आणि सुरेश आदमाने या पिता-पुत्रावर सदोष मनुष्यवधाचा (Section 304) गुन्हा दाखल करण्यात यावा. कर्तव्यात कसूर करणाऱ्या, गलथानपणा, पक्षपाती आणि एककल्ली अश्या नायब तहसीलदारांसह संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी ही मागणी करण्यात आलेली आहे.
या गंभीर आरोपांमुळे संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे. आता वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि महसूल अधिकारी या प्रकरणी काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शेख वसीम ड्रेसर यांची वाशिम जिल्हा रुग्णालयातील उत्कृष्ट अशी कामगिरी....

**दैनिक युवक आधार**
**मालेगाव) प्रतिनिधी करण धोंगडे.**
वाशिम जिल्हा सामान्य रुग्णालयातील शेख वसीम ड्रेसर यांनी केली उत्कृष्ट अशी कामगिरी,वेळेचे महत्व फक्त त्यांनाच विचारा जे रुग्णालयात जीवानाशी व मृत्यूशी झुंज घेतात तशीच उत्कृष्ट कामगिरी शेख वसीम ड्रेसर हे करत आहेत. प्रत्येक कर्मचारी वेळेच्या बंधनात कामे करतात पण वसीम वेळेला महत्त्व न देता जास्त आजारी माणसाला महत्त्व देतात घड्याळ सध्या 1/48 मिनिटे झाली आहे पण ते पेशेंटला अर्धवट सोडून जात नाही,त्यांची रुग्णालयात येण्याची वेळ येण्याची वेळ सकाळी 8 ते दुपारचे 5 वाजेपर्यंत.काहींना कामाचे पैसे



मिळतात,पण तसं काहीच नसतेच,शेख वसीम यांनी पहिले स्थान पाठवा पटकावले आहे. सन्माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी लोकाभिमुख आणि पारदर्शक प्रशासनाची संकल्पना साकार करण्यासाठी 100 दिवसांचा कार्यक्रम आखून दिला आहे. या उपक्रमांतर्गत प्रशासनातील कार्यक्षमतेसह संकेतस्थळ,सुधारणा,कार्यालयीन सोयीसुविधा,स्वच्छता,तक्रार निवारण,सुलभजीवनमान, तंत्रज्ञानाचा वापर,आणि गुंतवणुकीस जालना या निकषावर मूल्यांकन करण्यात आले.आरोग्य क्षेत्रात वासिम जिल्हा सामान्य रुग्णालयाने संपूर्ण निकषांची पूर्तता करीत राज्यात प्रथम क्रमांक पटकावला. शेख वसीम यांच्या दमदार कामगिरीमुळे त्यांचे जिल्हा स्तरातून सामाजिक,शैक्षणिक,मित्रमंडळी कडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# नांदेड शालेय जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत सिडको क्रीडा संकुलातील खेळाडूंची घवघवीत कामगिरीत

**दैनिक युवक आधार**
**मुदखेड(प्रतिनिधी) – योगेश चौदंते**
मनपा व ग्रामीण शालेय जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत तालुका क्रीडा संकुल सिडको भागातील खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ही स्पर्धा १६ व १७ सप्टेंबर रोजी इंडियन फोर्स अकॅडमी, उर्वशी घाट येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व नांदेड मनपा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती.
सिडको क्रीडा संकुलातील खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला होता. खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ सादर करत विविध गटांमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. विजेत्या खेळाडूंचा क्रीडा अधिकारी बालाजी शिरसीकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



अंडर-14 गटातील प्रथम क्रमांक पटकावणारे **खेळाडू:**
रोहित पवार,नरेंद्र सिंग गाडीवाले,मयंग युतराज
अंडर-19 गटातील प्रथम क्रमांक पटकावणारे खेळाडू:
वैभव माधव हटकर,लक्षित भीमराव निखाते,विजय तेलंग,आदित्य गायकवाड,सतप्रीत सिंग सुखमणी, करण संभाजी आढाव,ओंकार भिंगेवार,मयुरी गजभारे, राणी जाधव, धनश्री वाघमारे, समीक्षा कांबळे, वैष्णवी पांचाळ,सोनाक्षी सोनसळे
या यशामुळे सिडको भागातील खेळाडूंच्या कामगिरीचे जिल्ह्यात कौतुक होत असून आगामी स्पर्धांमध्येही हे खेळाडू चमकतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांच्या दिव्यांग प्रमाणपत्राची पडताळणी होणार - राजेंद्र लाड

## दिव्यांग कर्मचारी संघटनेच्या वतीने आदेशाचे स्वागत

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी**
**: मारुती सत्रे**
दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम,२०१६ च्या कलम - ९१ अन्वये जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत अधिकारी, कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या दिव्यांगत्वाच्या प्रमाणपत्रांची (युडीआयडी कार्ड) पडताळणी करण्यात येणार आहे. विभागाकडून त्याबाबतच्या सूचना राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना देण्यात आल्या आहेत. दिव्यांगत्वाच्या प्रमाणपत्र वैधतेबाबत विभागास अनेक तक्रारी प्राप्त झाल्याने ही पडताळणी करण्यात येत असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले आहे.
जिल्हा परिषदांमधील संबंधित सर्व विभागांतर्गत शिक्षण, आरोग्य, बांधकाम तसेच सर्व विभागात कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रमाणपत्रांची तपासणी करून लाक्षणीक दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींनाच शासनमान्य लाभ देण्यात येणार आहेत. पडताळणीअंती बनावट व नियमबाह्य प्रमाणपत्र किंवा ४० टक्क्यांपेक्षा कमी दिव्यांगत्व असल्याचे आढळल्यास संबंधितांना लाभ अनुज्ञेय केला जाणार नाही. अशा व्यक्तींना दिलेले लाभ बंद करण्यात येतील व त्यांनी घेतलेल्या लाभाबाबत कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम - ९१ नुसार, अपात्र व्यक्तीने लाभ घेतल्यास



किंवा घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यास दोन वर्षांपर्यंत कारावास, एक लाखापर्यंत दंड किंवा या दोन्ही शिक्षा होऊ शकतात. त्यामुळे पडताळणीअंती अपात्र ठरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांवर संबंधित तरतुदीनुसार कठोर कारवाई केली जाणार आहे. अशी माहिती शासन मान्य महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र लाड यांनी दिली आहे.
राज्यातील बोगस दिव्यांगांची झाडाझडती घेण्याचे लेखी आदेश गुरुवार दिनांक १८ सप्टेंबर २०२५ रोजी राज्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी राज्यातील सर्व ३४ जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले आहेत. हे आदेश मिळताच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिव्यांग प्रमाणपत्रांच्या पडताळणीला सुरुवात केली आहे. विशेष म्हणजे झेडपीच्या शिक्षण, आरोग्य, बांधकाम विभागासह सर्व विभागांतर्गत असलेले सर्व अधिकारी, कर्मचारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचा समावेश आहे. यामुळे बोगस प्रमाणपत्र घेणाऱ्या कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले असून प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांची झोप उडाली आहे.
या पडताळणीचा अहवाल महिनाभरात सर्व झेडपीच्या सर्व सीओंकडून दिव्यांग कल्याण आयुक्तांना सादर करण्याचे निर्देशही तुकाराम मुंढे यांनी दिले आहेत. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या कलम ९१ अन्वये बोगस दिव्यांग व्यक्तीला दोन वर्षांपर्यंत कारावास किंवा एक लाख रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षांसाठी पात्र ठरतो. राज्यात बोगस दिव्यांगांचा आकडा वाढला आहे. जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असणाऱ्या दिव्यांग अधिकारी व कर्मचारी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हे दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेतात. याबद्दलच्या विभागास अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारींमध्ये दिव्यांगांच्या वैश्विक ओळखपत्राबाबत साशंकता व्यक्त केली आहे. त्यामुळे राज्यातील सर्वच एकूण ३४ जिल्हा परिषदेतील दिव्यांगत्वाच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करण्याचे निर्देश दिव्यांग कल्याण विभागाने दिले आहेत. या आदेशाचे शासन मान्य महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेच्या वतीने स्वागत करण्यात येत आहे तसेच दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे साहेबांचे हा महत्त्वाचा आदेश काढल्याबद्दल आभार व्यक्त करण्यात येत आहेत असेही शेवटी राजेंद्र लाड यांनी म्हटले आहे.

# श्रीक्षेत्र देवतोरणे गावच्या सरपंचपदी सौ.विजयाताई देवाडे यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी**
मावळत्या सरपंच सौ आरती शिंदे यांनी त्यांच्या सरपंच पदाचा राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या सरपंच पदाच्या निवडी करिता दिनांक १५/०९/२०२५ रोजी निवडणूक निर्णय अधिकारी तथा मंडलाधिकारी श्रीमती मनीषा सुतार यांच्या अध्यक्षते खाली झालेल्या सभेत विजयाताई देवाडे यांचे एकमेव नामनिर्देशन पत्र प्राप्त झाल्याने त्यांची श्री क्षेत्र देवतोरणे गावच्या सरपंच पदी बिनविरोध निवड झाली. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध आकाशवाणी गायनाचार्य ह.भ.प.प्रभू महाराज देवाडे यांच्या सौभाग्यवती त्यांनी यापुर्वी तिन वर्षे देवतोरणे गावचे उपसरपंच म्हणून काम केले. यावेळी मा. सरपंच आरती शिंदे उपसरपंच सुनीता कलवडे, गौतम आवारी, किसन आवारी पोलीस पाटील अश्विनी देवाडे बाळासाहेब देवाडे नारायण देवाडे चेअरमन खंडू आवारी सुनील कलवडे मल्हारी शिवेकर व ग्रामस्थ उपस्थित होते.सचिव म्हणुन दीपक तळपे यांनी काम पाहिले.



# येवता गावामध्ये घाणीचे साम्राज्य; ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष...

## मनसे शाखा अध्यक्ष अमोल वानखडे यांनी दिला उपोषणाचा इशारा..

**दैनिक युवक आधार**
**चिखली प्रतिनिधी सिद्धार्थ धंदरे..**
चिखली (बुलढाणा) चिखली तालुक्यातील येवता गावामध्ये घाणीचे साम्राज्य मोठ्या प्रमाणात पसरले असून ग्रामपंचायत याकडे जाणून बुजून दुर्लक्ष करत आहे असा आरोप मनसे शाखा अध्यक्ष तथा माजी तंटामुक्ती समिती अध्यक्ष अमोल वानखडे यांनी केला आहे.गेल्या एक-दीड महिन्यापासून सतत निवेदन देऊन सुद्धा ग्रामपंचायत सरपंच,सचिव हे दुर्लक्ष करत आहेत.जर का निवेदन देऊन सुद्धा ग्रामपंचायतीने दखल घेतली नाही तर येणाऱ्या काळात उपोषण करण्यात येईल असा इशाराच अमोल वानखडे यांनी ग्रामपंचायतीला दिला आहे. येवता गावातील शाळेसमोरील मुख्य चौकात भयानक अशा प्रकारचे घाणीचे साम्राज्य निर्माण पसरले आहे.त्या मुख्य चौकातील जागेवर काही लोक आपली खाजगी वाहन



उभे करतात तर उभ्या असलेल्या वाहनाच्या पाठीमागे गावातले नागरिक त्या वाहनाच्या पाठीमागे जाऊन लघवीला बसतात त्यामुळे त्या ठिकाणी मुतारी तयार झाली आहे. या परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली आहे. शाळेतील मुले सुद्धा याच रस्त्याने ये-जा करतात या दुर्गंधीचा त्यांना प्रचंड असा त्रास होत आहे,गावकऱ्यांना सुद्धा या दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे.तसेच या वाहनामुळे शाळेतील मुलांचा अपघात होण्याची दाट शक्यता आहे ती नाकारता येत नाही.अपघाताचा प्रसंग घडल्यास त्याला सर्वस्वी ग्रामपंचायत जबाबदार राहील,असा आरोप व गावातील नागरिकांनी ग्रामपंचायतला केला आहे,या घाणीच्या साम्राज्यामुळे गावातील नागरिकांना तसेच लहान मुलांना आजारची लागण होत आहे. त्यामुळे वेळीच ग्रामपंचायतीने या निवेदनाची दखल घेऊन ताबडतोब गावातील घाणीच्या ठिकाणी स्वच्छता करून घ्यावी,अशी विनंती सुद्धा अमोल वानखडे यांनी केले आहे. यावेळी प्रदीप वानखडे,गौतम वानखडे,विजय चव्हाण,पंजाबराव घेवंदे,पंढरी मैद,संदीप वानखडे,सुरेश घेवंदे, सुरेश मा.घेवंदे,राहुल चव्हाण, राजकुमार चव्हाण,गजानन वानखडे,राहुल घेवंदे,प्रकाश घेवंदे उपस्थित होते.

# गजानन काळे पाटील "शहीद वीर भगतसिंग राष्ट्रीय पुरस्काराने"सन्मानित

**लातूर येथे अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती व ब्रिक्स ह्युमन राईट्स मिशनतर्फे सन्मान...**

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी**
**करण धोंगडे**
**सिल्लोड (छत्रपती संभाजीनगर)** अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती व ब्रिक्स ह्युमन राईट्स मिशनतर्फे भ्रष्टाचार निर्मूलन व समाजहितासाठी सातत्याने काम करणारे सिल्लोड तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते गजानन काळे पाटील यांना "शहीद वीर भगतसिंग राष्ट्रीय पुरस्कार" प्रदान करण्यात आला. हा सन्मान समारंभ लातूर येथे मोठ्या उत्साहात पार पडला. समाजकारणात पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि जनजागृतीसाठी केलेल्या कार्याची समितीने दखल घेत गजानन काळे पाटील यांना हा सन्मान बहाल केला. भ्रष्टाचारमुक्त समाज घडविण्यासाठी त्यांनी दाखविलेली धडपड,विविध स्तरावर घेतलेले उपक्रम आणि जनतेला दिलेला प्रामाणिकतेचा संदेश याचे कौतुक समितीने केले.समाजात ऐक्य,परस्पर सहकार्य,जबाबदारीची जाणीव




व स्वच्छ प्रशासनाची गरज अधोरेखित करण्यासाठी काळे पाटील यांनी राबविलेली मोहिम ही आजच्या काळात प्रेरणादायी असल्याचे पदाधिकाऱ्यांनी नमूद केले.यावेळी समितीच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.कविता रायजादा यांनी पाटील यांच्या कामाचा गौरव करताना ते भ्रष्टाचाराविरोधातील जनतेचे खरे प्रतिनिधी असल्याचे सांगितले. तर राष्ट्रीय अध्यक्ष प्रदिप पाटील बाबा खंडापुरकर यांनी समाजहितासाठी पाटील यांचे योगदान हे लढाऊ वृत्ती व आदर्श व्यक्तिमत्वाचे प्रतीक असल्याचे मत व्यक्त केले.या सन्मानामुळे सिल्लोड तालुक्यात अभिमानाची भावना व्यक्त होत असून तरुणाईसमोर भ्रष्टाचारविरोधी झुंज देण्याचे प्रेरणादायी उदाहरण उभे राहिले आहे.समाजकारणात शुद्धता, प्रामाणिकता व निस्वार्थीपणा यांचा आदर्श निर्माण करणारे गजानन काळे पाटील हे कार्यकर्ते असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.या वेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मा.आ.श्री. संजयजी बनसोडे (माजी मंत्री बंदरे महाराष्ट्र राज्य),मा.आ.श्री.रमेशअप्पा कराड (आमदार लातूर ग्रामीण विधानसभा,मा.श्री. विशालजी कोरे साहेब असिस्टंट कमांडट CRPF,राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापुरकर बाबा,प्रदेश अध्यक्ष पंडितराव तिडके,राणी ताई स्वामी,अमोल नानजकर, छ. संभाजी नगर जिल्हाध्यक्ष प्रदीप जगताप पाटील यांच्या सह अनेक पदाधिकारी व हजारो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# जाहीर प्रगटन

5802/3 जा.क्र.२०२५/वि.ज.मू.नो/कावी-तहसिल कार्यालय जाफ्राबाद.
दिनांकः-०८/०९/२०२५

सर्वत्र जनता ग्रामपंचायत कार्यालय, - ता. जाफ्राबाद जि.जालना यांना या जाहीर प्रगटनाब्दारे जाहीर करण्यात येतो की, अर्जदार स्वतः नामे- श्री/श्रीमती/कुमार/ कुमारीः- *गुलाबखा कदीरखा पठाण* रा. भारज बु ता. जाफ्राबाद यांचा / हिचा जन्म / मृत्यू दि.२९/०२/१९६५ रोजी मौजे, भारज बु ता. जाफ्राबाद येथे झालेला / झालेली आहे. तसेच वरील येथील रहीवाशी असून याचे जन्म/मृत्यूची ग्रामपंचायत कार्यालय, भारत्र व येथे नोंद केलीली नसल्यामुळे अर्जदार यांनी या कार्यालयात जन्म-मृत्यू नोंद घेणे बाबत विनंती अर्ज सादर केले आहे. सदरील जन्म/मृत्यू नोंदी बाबत कोणास काही आक्षेप असल्यास हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन (१५) दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयास दाखल करावेत, मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही. असे गृहीत धरून प्रकरणांत पूढील कार्यवाही येईल यांची नोंद घ्यावी.

**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार जाफ्राबाद.**
**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तवः**

१. पोलीस निरीक्षक / सहा पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे, जाफ्राबाद/देभूर्णी यांना जाहीर प्रकटनाच्या दोन प्रती देवून सुचीत करण्यात येते की, अर्जदार संबधीत गावाचे रहिवाशी आहेत किंवा नाहीत याबाबत जन्म/मृत्यू आदेश देण्याविषयी विषयी सर्व पुराव्याची चौकशी करून आपले कार्यालयाचे हरकत आहे / नाही याबाबत या कार्यालयास विना विलंब अहवाल सादर करावा.
२. ग्रामपंचायत कार्यालय / नगरपंचायत, जाफ्राबाद / ग्राम महसूल अधिकारी भारजब ता. जाफ्राबाद यांना जाहीर प्रकटनाच्या दोनप्रती देवून सुचीत करण्यात येते की, जाहीर प्रकटनाची प्रसिध्दी गावात करुन प्रसिध्दी तसेच संबंधीत गावाचे रहिवाशीआहेत किंवा नाहीत व जन्म/मृत्यू विषयी सर्व पुराव्याची चौकशी / पंचनामा आपले कार्यालयाचे हरकत आहे / नाही याबाबत या कार्यालयास विना विलंब अहवाल सादर करावा.
३. दे... वृत्तपत्र यांना जाहीर प्रकटनाच्या दोन प्रती देवून सुचीत करण्यात येते की, जाहीर प्रकटनाची वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी करण्याबाबत छपाईची येणारा खर्च संबंधीताकडून घेण्यात येडून जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे. नसता हे न्यायालय छपाई खर्चासाठी जबाबदार राहणार नाही. सदर प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास अर्जदार मार्फत सादर करावा
श्री/श्रीमतीः गुलाबच्चा कदीरखा पठाण रा. भारज ता. जाफ्राबाद जि. जालना आपणांस कळविण्यात येते की, आपण दोन साक्षीदार यांचे शपतमेवरील प्रतिज्ञापत्र (त्यातील एक रक्ताचा नातेवाहीक असावा) व शाक्षीदाराचे शपतपत्र तसेच त्याची जन्म / मृत्यू नोंद पाहीचे त्याचे रुग्णालयातील नोंदीचे लसीकरणाचे पुरावे / अंगनवाडी सेविका व तत्सम अन्य कर्मचारी यांचे जवाव / प्रतिज्ञापत्र रुग्णालयीन कागदपत्रे इ. 1) शैक्षणिक पुरावे जसे की, निर्गम उत्तारा / टी.सी / बोनाफाईड इ. 2) रहिवासाचे पुराने जसे की, मालमत्ता कराची पावती, पाणीपटटी, बिज बिल इ. 3) मालमत्तेचे पुरावे जसे की, सातबारा उतारा / नमुना नं. ०८ अ चा उतारा / फेरफार / मिळकत उतारा / नोंदणीकृत दस्त / महसूल पुरावा ४. 4) ओळखीचे पुरावे जसे की, वाहन परवाना / पॅन कार्ड / मतदान कार्ड / जॉब कार्ड/ ई-आधार कार्ड/ पास पोर्ट इ. 5) कौटुंबिक पुरावे परिवारातील सदस्यांचे जन्म / मुत्यु प्रमाणपत्र / राशन कार्ड / कुंटूव प्रमाणपत्र / विवाह प्रमाणपत्र इ. 6) मृत्युच्या अनुषंगाने सब विच्छेदन अहवाल / प्र.खवरी अहवाल, सन्थालयीन कागदपत्रे इ. 7) तसेच पोलीस पाटील / कोतवाल / सरपंच / नगर सेवक यांचा स्यानीक चौकशी बहवाल या कार्याभवात 7 दिवसाच्या आत सादर करावे, विविध मुदतीत आपण दस्तावेज सादर न केल्यास प्रकरण बंद करन निकाली काढण्यात आले असे समजण्यात यावी.
५. वा कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर झडकविण्यासाठी .

**कार्यकारी पंडाधिकारी**
**तथा तहसिलदार जाफ्राबाद**

## सिल्लोड एलआयसी शाखेत विभागीय अध्यक्षांच्या उपस्थितीत जीएसटी रद्द आनंदोत्सव जल्लोषात साजरा

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर**

**सिल्लोड** - दि. २२ सप्टेंबर रोजी दुपारी एलआयसी विमाहफ्त्यांवर जीएसटी रद्द झाल्याबद्दल लाईफ इन्शुरन्स एजंट फेडरेशन ऑफ इंडिया तर्फे भव्य आनंदोत्सव साजरा करण्यात आला.यावेळी सर्वप्रथम फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली व उपस्थित एलआयसी ग्राहकांना सवलतीची माहिती देण्यात आली व यावेळी संघटनेचे विभागीय अध्यक्ष श्री सुनील पालोदकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, संघटनेचे पूर्ण देशपातळीवर विविध पध्दतीने जीएसटी माफ करण्याची मागणी सातत्याने सरकारच्या कानावर घातली व संभाजीनगर डिव्हिजनने विशेष संघटनेचे अधिवेशन बोलावून त्यात अर्थराज्यमंत्री ना.कराडसरांना ह्या संदर्भात मागणी केली,धरणे आंदोलन विभागीय कार्यालयावर करण्यात आली व सर्व प्रयत्नांचे फलित म्हणून हा सोनियाचा दिवस उगवला.

प्रशासकीय अधिकारी नाकीलसर यांनी विमा प्रतिनिधी तळमळ व त्यांची जनसेवा यांचे कौतुक केले तर अध्यक्षस्थानावरून उपशाखाधिकारी जाधव सर यांनी निर्णयाचे स्वागत करतानांच एजंटबंधूंनी व्यवसाय वाढवावा असे आवाहन केले. आभारप्रदर्शन सिल्लोड लियाफी संघटनेचे अध्यक्ष पी टी ठाले यांनी केले तर सुत्रसंचलन सुरेश घोंगडे यांनी केले.

यावेळी तडवीसर ,लियाफी शाखा उपाध्यक्ष अनिल कुलकर्णी,संघटना सदस्य सोमिनाथ ठाले,वसंत विसपुते,जी आर मगर, सुरेश चौधरी,घुले,प्रशासकीय अधिकारी तडवी सर, कर्मचारी वर्ग ,ग्राहक, विमा प्रतिनिधी
उपस्थितीत होते.पेढे वाटून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली



## त्र्यंबकेश्वरमध्ये पत्रकारांवर जीवघेणा हल्ला; निफाडमध्ये तीव्र निषेध"

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**



त्र्यंबकेश्वर येथे श्री स्वामी समर्थ केंद्राजवळ नगरपालिकेच्या नावाखाली कर वसुली करणाऱ्या गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींनी पत्रकारांवर जीवघेणा हल्ला केला. या दरम्यान पत्रकार किरण ताजणे, योगेश खरे व अभिजीत सोनवणे यांना दगड, काठ्या आणि छत्रीने मारहाण करण्यात आली. या हल्ल्यात तिघेही गंभीर जखमी झाले आहेत.या घटनेविरोधात निफाड तालुक्यातील पत्रकार बांधवांनी एकत्र येत पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांना निवेदन देऊन तीव्र निषेध नोंदविला. निवेदनाद्वारे गुंड प्रवृत्तीच्या संबंधितांवर कठोरातील कठोर कारवाई करून शिक्षा करण्यात यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली.या निषेध नोंदविण्याच्या वेळी पत्रकार राहुल दवते, राजेंद्र थोरात, अमोल जाधव, योगेश कर्डिले, राहुल कुलकर्णी,विनोद गायकवाड, पंकज सोमवंशी यांच्यासह अनेक पत्रकार बांधव उपस्थित होते.

# जाहीर प्रगटन

जा.क्र. २०२५/वि.ज.मू.नो/काबी-तहसिल कार्यालय जाफ्राबाद. दिनांकः-०८/०९/२०२५

सर्वत्र जनता ग्रामपंचायत कार्यालय, भारत कु. ता.क 7. ता. जाफ्राबाद जि. जालना यांना या जाहीर प्रगटनाब्दारे जाहीर करण्यात येतो की, अर्जदार स्वतः नामे श्री/श्रीमती/कुमार/कुमारीः *आसिफखा असदखा सिकलीगर* रा.भारज बु ता. जाफ्राबाद यांचा / हिचा जन्म / मृत्यू दि.१५/०४/१९८४ रोजी मौजे, भारज बु. ता. जाफ्राबाद येथे झालेला / झालेली आहे. तसेच वरील येथील रहीवाशी असून याचे जन्म/मृत्यूची ग्रामपंचायत कार्यालय, कारी क
येथे नोंद केलीली नसल्यामुळे अर्जदार यांनी या कार्यालयात जन्म-मृत्यू नोंद घेणे बाबत विनंती अर्ज सादर केले आहे. सदरील जन्म/मृत्यू नोंदी बाबत कोणास काही आक्षेप असल्यास हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन (१५) दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयास दाखल करावेत. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही. असे गृहीत धरून प्रकरणांत पूढील कार्यवाही येईल यांची नोंद घ्यावी.

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार जाफ्राबाद.**
**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.**

१. पोलीस निरीक्षक / सहा पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे, जाफ्राबाद/टभूर्णी यांना जाहीर प्रकटनाच्या दोन प्रती देवून सुचीत करण्यात येते की, अर्जदार संबंधीत गावाचे रहिवाशी आहेत किंवा नाहीत याबावत जन्म/मृत्यू आदेश देण्याविषयी विषयी सर्व पुराव्याची चौकशी करून आपले कार्यालयाचे हरकत आहे / नाही याबाबत या कार्यालयास विना विलंब अहवाल सादर करावा.
२. ग्रामपंचायत कार्यालय / नगरपंचायत, जाफ्राबाद / ग्राम महसूल अधिकारी भारत क जाफ्राबाद यांना जाहीर प्रकटनाच्या दोनप्रती देवून सुचीत करण्यात येते की, जाहीर प्रकटनाची प्रसिध्दी गावात करुन प्रसिध्दी तसेच संबधीत गावाचे रहिवाशीआहेत किंवा नाहीत व जन्म/मृत्यू विषयी सर्व पुराव्याची चौकशी / पंचनामा आपले कार्यालयाचे हरकत आहे / नाही याबाबत या कार्यालयास बिना विलंब अहवाल सादर करावा.
३. दे.. वृत्तपत्र यांना जाहीर प्रकटनाच्या दोन प्रती देवून सुचीत करण्यात येते की, जाहीर प्रकटनाची वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी करण्याबाबत छपाईची येणारा खर्च संबंधीताकडून घेण्यात येडून जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे. नसता हे न्यायालय छपाई खर्चासाठी जबाबदार राहणार नाही. सदर प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास अर्जदार मार्फत सादर करावा.
**श्री/श्रीमतीः आसिफखा असदखा सिकलीगर रा.**
भारत के ता. जाफ्राबाद जि. जालना आपणांस कळविण्यात येते की, आपण दोन शाक्षीदार यांचे शपतथेवरील प्रतिज्ञापत्र (त्यातील एक रक्ताचा नातेवाहीक असावा) व शाक्षीदाराचे शपतपत्र तसेच त्याची जन्म मृत्यू नोंद पाहीचे त्याचे रूग्णालयातील नोंदीचे लसीकरणाचे पुरावे / अंगनवाडी सेविका व तत्सम अन्य कर्मचारी यांचे जवाब / प्रतिज्ञापत्र रूग्णालयीन कागदपत्रे इ. 1) शैक्षणिक पुरावे जसे की, निर्गम उतारा / टी.सी/ बोनाफाईड इ. 2) रहिवासाचे पुरावे जसे की, मालमत्ता कराची पावती, पाणीपटटी, विज बिल इ. 3) मालमत्तेचे पुरावे जसे की, सातबारा उतारा / नमुना नं. ०८ अ चा उतारा / फेरफार / मिळकत उतारा / नोंदणीकृत दस्त / महसूल पुरावा इ. 4) ओळखीचे पुरावे जसे की, बाहन परवाना / पॅन कार्ड / मतदान कार्ड जॉब कार्ड ई-आधार कार्ड / पास पोर्ट इ. 5) कौटुंबिक पुरावे परिवारातील सदस्यांचे जन्म / मुत्यू प्रमाणपत्र / राशन कार्ड/ कुंटूब प्रमाणपत्र / विवाह प्रमाणपत्र इ. 6) मृत्युच्या अनुषंगाने शव विच्छेदन अहवाल / प्र.खबरी अहवाल, रूग्णालयीन कागदपत्रे इ. 7) तसेच पोलीस पाटील / कोतवाल / सरपंच / नगर सेवक यांचा स्थानीक चौकशी अहवाल या कार्यालयात 7 दिवसाच्या आत सादर करावे. विविध मुदतीत आपण दस्तावेज सादर न केल्यास प्रकरण बंद करुन निकाली काढण्यात आले असे समजण्यात यावी.
५. या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर डकविण्यासाठी.

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार**
**जाफ्राबाद**

## सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचे गुरुवारी पनवेलमध्ये पारितोषिक वितरण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध समाजोपयोगी क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी बजावणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २४ व्या राज्यस्तरीय व रायगड जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा गुरुवार दिनांक २५ सप्टेंबर रोजी दुपारी ०३ वाजता पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे. या वेळी राज्याचे सांस्कृतिक मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते विजेत्या दिवाळी अंकांना पारिताषिके प्रदान करण्यात येणार आहेत.



सोहळ्याला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष सदानंद मोरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत, तर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. दिवाळी अंकांच्या परंपरेला प्रोत्साहित करणाऱ्या या स्पर्धेतील विजेत्यांना लाखो रुपयांची पारितोषिके देऊन त्यांच्या सर्जनशीलतेचा सन्मान केला जातो. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव परेश ठाकूर, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हा समारंभ होणार आहे, असे मुंबई मराठी पत्रकार संघाचे कार्यवाह शैलेंद्र शिर्के आणि स्पर्धा समन्वयक दीपक म्हात्रे यांनी कळविले आहे.

# जाहीर प्रगटन

58033
जा.क्र.२०२५/वि.ज.मू.मो/कावी-तहसिल कार्यालय जाफ्राबाद, दिनांकः-०८/०९/२०२५

भारज बुद्रुक ता. जाफ्राबाद जि. जालना यांना या जाहीर प्रगटनाव्दारे सर्वत्र जनता ग्रामपंचायत कार्यालय, जाहीर करण्यात येतो की, अर्जदार स्वतः नामे श्री/श्रीमती/कुमार/कुमारीः *उस्मानखा रहेमानखा पठाण* रा. भारज बु ता. जाफ्राबाद यांचा / हिचा जन्म / मृत्यू दि. १५/०५/१९८२ रोजी मौजे, भारज बु ता. जाफ्राबाद येथे झालेला / झालेली आहे. तसेच वरील येथील रहीवासी असून वाचे जन्म/मृत्यूची ग्रामपंचायत कार्यालय, भारतबा येथे नोंद केलीली नसल्यामुळे अर्जदार यांनी या कार्यालयात जन्म-मृत्यू नोंद घेणे बाबत विनंती अर्ज सादर केले आहे. सदरील अन्म/मृत्यू नोंदी बाबत कोणास काही आक्षेप असल्यास हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन (१५) दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयास दाखल करावे है. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही. असे गृहीत धरून प्रकरणांत पूढील कार्यवाही येईल यांची नोंद घ्यावी कार्यकारी दंडाधिकारी

**तथा तहसिलदार जाफ्राबाद.**
**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.**

१. पोलीस निरीक्षक / सहा पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे, जाफ्राबाद टेभूर्णी यांना जाहीर प्रकटनाच्या दोन प्रती देवून सुचीत करण्यात येते की, अर्जदार संबधीत गावाचे रहिवाशी आहेत किंवा नाहीत याबाबत जन्म/मृत्यू आदेश देण्याविषयी विषयी सर्व पुराव्याची चौकशी करून आपले कार्यालयाचे हरकत आहे / नाही याबाबत या कार्यालयास विना विलंब अहवाल सादर करावा.
अधिकारी भारन २. ग्रामपंचायत कार्यालय / नगरपंचायत, जाफ्राबाद / ग्राम महसूल अधिकारी..? ता. जाफ्राबाद यांना जाहीर प्रकटनाच्या दोनप्रती देवून सुचीत करण्यात येते की, जाहीर प्रकटनाची प्रसिध्दी गावात करुन प्रसिध्दी तसेच संबंधीत गाथाचे रहिवाशी आहेत किंवा नाहीत व जन्म/मृत्यू विषयी सर्व पुराव्याची चौकशी / पंचनामा आपले कार्यालयाचे हरकत आहे / नाही याबाबत या कार्यालयास विना विलंब अहवाल सादर करावा.
वृत्तपत्र यांना जाहीर प्रकटनाच्या दोन प्रती देवून सुचीत करण्यात येते की, जाहीर प्रकटनाची वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी करण्याबाबत छपाईची येणारा खर्च संबंधीताकडून घेण्यात येडून जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे. नसता हे न्यायालय छपाई खर्चासाठी जबाबदार राहणार नाही. सदर प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास अर्जदार मार्फत सादर करावा.
श्री/श्रीमतीः उस्मानखा रहेमानखा पठाण रा. भारनल ता. जाफ्राबाद जि. जालना आपणांस कळविण्यात येते की, आपण दोन शाक्षीदार यांचे शपतवेवरील प्रतिज्ञापत्र (त्यातील एक रक्ताचा नातेवाहीक असावा) व शाक्षीदाराचे अपतपत्र तसेच त्याची जन्म / मृत्यू नोंद पाहीचे त्याचे रुग्णालयातील नोंदीचे लसीकरणाचे पुरावे / अंगनवाडी सेविका व तत्सम अन्य कर्मचारी यांचे जबाव / प्रतिज्ञापत्र रुग्णालयीन कागदपत्रे इ. 1) शैक्षणिक प्रावे जने की, निर्गम उतारा / टी.सी/ बोनाफाईड इ. 2) रहिवासाचे पुरावे जने की, मालमत्ता कराची पावती, पाणीपटटी, विज चिल इ. 3) मालमत्तेचे पुरावे जसे की, सातबारा उतारा / नमुना नं. २८ अ चा उतारा / फेरफार / मिळकत उतारा / नोंदणीकृत दस्त / महसूल पुरावा इ. 4) ओळखीचे पुरावे जसे की, वाहन परवाना / पॅन कार्ड / मतदान कार्ड / जॉब कार्ड । ई-आधार कार्ड/ पास पोर्ट इ. 5) कौटुंबिक पुरावे परिवारातील सदस्यांचे जन्म / मुत्यु प्रमाणपत्र / राशन कार्ड / कुंटूय प्रमाणपत्र / विवाह प्रमाणपत्र इ. 6) मृत्युच्या अनुषंगाने तब विच्छेदन अहवाल / प्र.खबरी बहवाल, रुग्णालयीन कागदपत्रे इ. 7) तसेच पोलीस पाटील कोतवाल / सरपंच / नगर सेवक यांचा स्थानीक चौकशी अहवाल या कार्यालयात 7 दिवसाच्या आत सादर करावे, विविध मुदतीत आपण दस्तावेज सादर न केल्यान प्रकरण बंद करुन निकाली काढण्यात आले असे समजण्यात यावी.
५. या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर झडकविण्यासाठी,

**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार जाफ्राबाद**

# जाहीर प्रगटन

5804/3
जा.क्र.२०२५/वि.ज.मू.नो/कावी-तहसिल कार्यालय जाफ्राबाद.
दिनांकः-०८/०९/२०२५

ता. जाफ्राचाद जि. जालना यांना या जाहीर प्रगटनाव्दारे सर्वत्र जनता ग्रामपंचायत कार्यालय, भारावू जाहीर करण्यात येतो की, अर्जदार स्वतः नामे- श्री/श्रीमती/कुमार/कुमारीः- *सांडूखा रहेमानखा पठाण* रा. भारज बु ता. जाफ्राबाद यांचा / हिचा जन्म / मृत्यू दि. ०१/०१/१९६४ रोजी मौजे, भारज बु ता. जाफ्राबाद येथे झालेला / झालेली आहे, तसेच वरील येथील रहीवाशी असून याचे जन्म/मृत्यूची ग्रामपंचायत कार्यालय, मारक येथे नोंद केलीली नसल्यामुळे अर्जदार यांनी या कार्यालयात जन्म-मृत्यू नोंद घेणे बाबत विनंती अर्ज सादर केले आहे. सदरील जन्म मृत्यू नोंदी बाबत कोणास काही आक्षेप असल्यास हे जाहिर प्रगटन आक्षेप नाही. असे गृहीत धरून प्रकरणांत पूढील कार्यवाही येईल यांची नोंद घ्यावी.
प्रसिध्द झाल्यापासुन (१५) दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयास दाखल करावेत. मुदतीत आप प्राप्त न काल्यास कोणास काही कार्यकारी दंडाधिकारी

**तथा तहसिलदार जाफ्राचाद.**
**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव,**

१. पोलीस निरीक्षक / सहा पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे, जाफ्राबाद/टिभूर्णी यांना जाहीर प्रकटनाच्या दोन प्रती देवून सुचीत करण्यात येते की, अर्जदार संबधीत गावाचे रहिवाशी आहेत किंवा नाहीत याबाबत जन्म/मृत्यू आदेश देण्याविषयी विषयी सर्व पुराव्याची चौकशी करून आपले कार्यालयाचे हरकत आहे / नाही याबाबत या कार्यालयास विना विलंब अहवाल सादर करावा.
२. ग्रामपंचायत कार्यालय / नगरपंचायत, जाफ्राबाद / ग्राम महसूल अधिकारी भारत बु... ता. जाफ्राबाद यांना जाहीर प्रकटनाच्या दोनप्रती देवून सुचीत करण्यात येते की, जाहीर प्रकटनाची प्रसिध्दी गावात करुन प्रसिध्दी तसेच संबधीत गावाचे रहिवाशीआहेत किंवा नाहीत व जन्म/मृत्यू विषयी सर्व पुराव्याची चौकशी / पंचनामा आपले कार्यालयाचे हरकत आहे / नाही याबाबत या कार्यालयास बिना विलंब अहवाल सादर करावा.
वृत्तपत्र यांना जाहीर प्रकटनाच्या दोन प्रती देवून सुचीत करण्यात येते की, जाहीर प्रकटनाची वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी करण्याबाबत छपाईची येणारा खर्च संबंधीताकडून घेण्यात येडून जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे. नसता हे न्यायालय छपाई खर्चासाठी जबाबदार राहणार नाही. सदर प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास अर्जदार मार्फत सायर करावा.
श्री/श्रीमतीः सांडूचा रहेमानखा पठाण रा. सारन बु. - ता. जाफ्राबाद जि. जालना आपणांस कळविण्यात येते की, आपण दोन शाक्षीदार यांचे शपतयेवरील प्रतिज्ञापत्र (त्यातील एक रक्ताचा नातेवाहीक असावा) व शाक्षीदाराचे शपठपत्र तसेच त्याची जन्म / मृत्यू नोंद पाहीचे त्याचे रुग्णालयातील नोंदीचे लसीकरणाचे पुरावे / अंगनवाडी सेविका व तत्सम अन्य कर्मचारी यांचे जवान / प्रतिज्ञापत्र रुग्णालयीन कामदपणे इ. 1) मैक्षणिक पुराचे जसे की, निर्मम उत्तारा/टी.सी/बोनाफाईड इ. 2) रहिवासाचे पुराने जसे की, मालमत्ता कराची पावती, पाणीपटटी, विज बिल ४. 3) मालमत्तेचे पुरावे जसे की, सातबारा उतारा / नमुना नं. ०८ अ चा उतारा / फेरफार / मिळकत उतारा / नोंदणीकृत दस्त / महसूल पुरावा इ. 4) ओळखीचे पुरावे जसे की, वाहन परवाना / पैन कार्ड / मतदान कार्ड/ जॉब कार्ड / ई-आधार कार्ड / पास पोर्ट इ. 5) कौटुंबिक पुरावे परिवारातील सदस्यांचे जन्म / मुत्यु प्रमाणपत्र / राशन कार्ड / कुंट्य प्रमाणपत्र / विवाह प्रमाणपत्र इ. 6) मृत्युच्या अनुषंगाने शव विच्छेदन अहवाल / प्र.खवरी बयान, रुग्णालयीन कागदपत्रे द्र. 7) तसेच पोलीस पाटील / कोतवाल / सरपंच नगर सेवक यांचा स्थानीक चौकशी अहवाल या कार्यालयात 7 दिवसाच्या आत सादर करावे, विविध मुदतीत आपण दस्तावेज सादर न केल्यास प्रकरण बंद करुन निकाली कारण्यात आले असे समजण्यात यावी.
५. या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर डकविण्यासाठी.

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार**
**जाफ्राचाद**

# जाहीर प्रगटन

5805/3
जा.क्र.२०२५/वि.ज.मु.नो/कावी-तहसिल कार्यालय जाफ्राबाद, दिनांकः-०८/०९/२०२५

सर्वत्र जनता ग्रामपंचायत कार्यालय, भारज बुद्रुक ता जाफ्राबाद जि. जालना यांना या जाहीर प्रगटनाव्दारे जाहीर करण्यात येतो की, अर्जदार स्वतः नामे श्री/श्रीमती/कुमार कुमारी *मुस्ताकखा नसीरखा सिकलीगर* रा. भारज बु ता. जाफ्राबाद यांचा / हिचा जन्म / मृत्यू दि. ०१/०१/१९४५ रोजी मौजे, भारज बु ता. जाफ्राबाद येथे झालेला / झालेली आहे. तसेच वरील पेधीन रहीवासी असून याचे जन्म/मृत्यूची ग्रामपंचायत कार्यालय, भारजव येथे नोंद केलीली नसल्यामुळे अर्जदार यांनी या कार्यालयात जन्म-मृत्यू नोंद घेणे बाबत विनंती अर्ज सादर केले आहे. सदरील जन्म/मृत्यू नोंदी बाबत कोणास काही आक्षेप असल्यास हे जाहिर प्रमटन प्रसिध्द झाल्यापासुन (१५) दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयास दाखल करावेत. मुदतीत मुदतीत आक्षेप आक्षे प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही, असे गुहीत धरून प्रकरणांत पूढील कार्यवाही येईल यांची

**नोंद घ्यावी कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार जाफ्राबाद,**
**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तवः**

१. पोलीस निरीक्षक / सहा पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे, जाफ्राबादटिभूर्णी यांना जाहीर प्रकटनाच्या दोन प्रती देवून सुचीन करण्यात येते की, अर्जदार संबधीत गावाचे रहिवाशी आहेत किंवा नाहीत याचाबत जन्म/मृत्यू आदेश देण्याविषयी विषयी सर्व पुराव्याची चौकशी करून आपले कार्यालयाचे हरकत आहे / नाही याबाबत या कार्यालयास विना विलंब अहवाल सादर करावा.
ता. जाफ्राबाद यांना २. ग्रामपंचायत कार्यालय / नगरपंचायत, आफ्राबाद / ग्राम महसूल अधिकारी भारज बू जाहीर प्रकटनाच्या दोनप्रती देवून सुचीत करण्यात येते की, जाहीर प्रकटनाची प्रसिध्दी गावात करुन प्रसिध्दी तसेच संबंधीत गावाचे रहिवाशीजाहेत किंवा नाहीत व जन्म/मृत्यू विषयी सर्व पुराव्याची चौकशी / पंचनामा आपले कार्यालयाचे हरकत आहे / नाही याबाबत या कार्यालयास विना विलंब अहवाल सादर करावा.
३. दे....... वृत्तपत्र यांना जाहीर प्रकटनाच्या दोन प्रती देवून सुचीत करण्यात येते की, जाहीर प्रकटनाची वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी करण्याबाबत छपाईची येणारा खर्च संबंधीताकडून घेण्यात येडून जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे. नसता हे न्यायालय छपाई खर्चासाठी जबाबदार राहणार नाही. सदर प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास अर्जदार मार्फत सादर कराया.
श्री/श्रीमतीः मुस्ताकच्चा नसीरखा सिकलीगर रा. ता. जाफ्राबाद जि. जालना आपणांस कळविण्यात येते की, आपण दोन शाक्षीदार यांचे शपतथेवरील प्रतिज्ञापत्र (त्यातील एक रक्ताचा नातेवाहीक असावा) व शाक्षीदाराचे शपतपत्र तसेच त्याची जन्म / मृत्यू नोंद पाहीचे त्याचे रुग्णालयातील नोंदीचे लसीकरणाचे पुरावे / अंगनवाडी सेविका व तत्सम अन्य कर्मचारी यांचे जवाव / प्रतिज्ञापत्र रुग्णालयीन कागदपत्रे इ. 1) शैक्षणिक पुरावे जसे की, निर्गम उतारा / टी.सी / बोनाफाईड इ. 2) रहिवासाचे पुरावे जसे की, मालमत्ता कराची पाचती, पाणीपटटी, चिज बिल इ. ३) मालमत्तेचे पुरावे जसे की, सातबारा उत्तारा / नमुना नं. ०८ अ चा उतारा / फेरफार / मिळकत उतारा / नोंदणीकृत दस्त / महसूल पुरावा इ. 4) ओळखीचे पुरावे जसे की, वाहन परवाना / पॅन कार्ड / मतदान कार्ड / जॉब कार्ड / ई-आधार कार्ड / पास पोर्ट इ. 5) कौटुंबिक पुरावे परिवारातील सदस्यांचे जन्म / मुत्यु प्रमाणपत्र / राशन कार्ड / कुंटूव प्रमाणपत्र / विवाह प्रमाणपत्र इ. 6) मृत्युच्या अनुषंगाने शब विच्छेदन अहवाल / प्र.खवरी अहवाल, रूग्णालयीन कागदपत्रे ४. 7) तसेच पोलीस पाटील / कोतवाल / सरपंच / नगर सेवक यांचा स्थानीक चौकशी अहवाल या कार्यालयात 7 दिवसाच्या आत्त सादर कराचे विविध मुदतीत आपण दस्तावेज सादर न केल्यास प्रकरण बंद करुन निकाली काढण्यात जाले असे समजण्यात यावी.
५. या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर डकविण्यासाठी.

**कार्यकारी**
**तथा तहसिलदार जाफ्राबाद**
**शिव जन्म/मृत्यू नींद जाहीर प्रगटन**

# सभापतींची कर्मचाऱ्यांना अशिलल शिवीगाळ

## साकोली पंचायत समितीतील प्रकार ; अधिकारी कर्मचारींतर्फे तीव्र निषेध व लेखणी बंद

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा** - मासिक सभा संपल्यावर पंचायत समिती सभापतींनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना अवांतर भाषेत अश्लिल शिवीगाळ करीत शासकीय कर्मचारींची मानहानी केली. त्यांनी सर्वांची जाहीर माफी मागावी. जोपर्यंत माफी मागत नाही तोपर्यंत लेखणी बंद आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्णय घेत ( सोम. २२ सप्टें.) ला खंड विकास अधिकारी व आमदार नाना पटोले यांना निवेदन देण्यात आले. याप्रकरणी साकोलीत चांगलेच वातावरण तापलेले आहे.

शुक्रवार १९ सप्टेंबरला पंचायत समितीत मासिक सभा संपल्यावर सभापती ललित शंकर हेमने यांनी पं. स. मधील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना अवांतर भाषेत अश्लील शिवीगाळ करीत "सर्व अधिकारी कर्मचारी ( अशिलल शब्द ) आहेत, चोर आहेत. पैसे घेतल्याशिवाय कोणतेही काम करीत नाहीत, कोणीही




दुधाने धुतलेले नाहीत. दारुसाठी मागेमागे येतात" अशा प्रकारच्या अशोभनिय भाषेत स्वतःचे कक्षात व कक्षाबाहेर कार्यालयाचे व्हरांड्यात मोठमोठया आवाजात ओरडून बोलत अश्लील व अशोभनिय भाषेत शिवीगाळ केली. याशिवाय कार्यालयातील महिला अधिकारी कर्मचारी उपस्थित असतांना सुध्दा अश्लील भाषेत शिवीगाळ केली. ही बाब कार्यालयीन दृष्टीने अत्यंत अशोभनिय आहे व अधिकारी कर्मचारी-यांचे आत्मसन्मान खच्चीकरण करणारी आहे. सदर प्रकरणामुळे अधिकारी कर्मचा-यांमध्ये असंतोष निर्माण झालेला आहे.

सदर घडलेल्या घटनेचा आम्ही सर्व अधिकारी व कर्मचारी तीव्र निषेध करुन सभापती पं. स. साकोली हे जोपर्यंत घडलेल्या प्रकारावर पंचायत समिती साकोली कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची जाहीर माफी मागत नाही तो पर्यंत दि. २२ सप्टेंबर पासून आम्ही खालील सही करणारे अधिकारी व कर्मचारी, ग्रामपंचायत अधिकारी यांनी "लेखनी बंद" करण्याचा निर्णय घेतलेला आहे. असे निवेदन आमदार नाना पटोले, मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. भंडारा यांना सुद्धा देण्यात आले. या प्रसंगी पंचायत समिती मधील सर्व कर्मचारी व अधिकारी तसेच सर्व ग्रामपंचायत अधिकारी प्रामुख्याने उपास्ति होते. व ग्रामपंचायत अधिकारी संघटनांनी सुद्धा निवेदन दिले. या संतापजनक प्रकारामुळे जिल्हा परिषद, पंचायत समितीतील वातावरण तापले असून एक पदस्थ सभापतींना अधिकारी व कर्मचाऱ्यांना अशिलल शिवीगाळ ही भाषा शोभून दिसते का.? या प्रकाराने सर्व जनतेसमोर आमचा अपमान झाला यावर तातडीने दखल घेतली नाही तर लेखणी बंद आंदोलन सुरू राहील अशी प्रतिक्रिया साकोली पंचायत समितीच्या आवारात सुरु होती. सदर निवेदनात गटविकास अधिकारी पी. व्ही. जाधव, सहा. गटविकास अधिकारी प्रदीप समरीत, गटशिक्षणाधिकारी विजय आदमने यांसह अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# चौलमध्ये संतापाची लाट!

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

१० वर्षांच्या निरागस चिमुरडीचा विनयभंग; ५४ वर्षीय नराधम रामा मगर पोलिसांच्या ताब्यात

चौलच्या मातीत घडलेली ही घटना प्रत्येकाला चीड आणणारी, अंगावर काटा आणणारी ठरली आहे. फक्त दहा वर्षांच्या निरागस अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने चौल गाव हादरून गेले आहे. या घृणास्पद कृत्यासाठी संतोष उर्फ (रामा) गोविंद मगर (वय ५४, रा. चौल, वर्तक आळी शेजारी) या नराधमाला रेवदंडा पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.ही घटना २० सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १२ ते १२.४५ दरम्यान चौल पाण्याच्या टाकीजवळ घडली. शाळेतून निरागसतेने घरी परतणाऱ्या चिमुरडीला आरोपीने ओळखीचा फायदा घेत जवळ बोलावलं. मोबाईलमधून अश्लील व्हिडिओ दाखवत त्याने लाजिरवाणं वर्तन करून तिचा विनयभंग केला. या विकृत प्रकारामुळे चौल परिसरात संतापाचा ज्वालामुखी उसळला आहे.या प्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्र. ११६/२०२५ नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ७२(२), ७४, ७५(३) तसेच POCSO कायद्यातील कठोर कलमे ७, ८, ९(एम), १०,



११(३), १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरवले यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू असून, स्थानिक नागरिकांनी या प्रकरणी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. "मुलींच्या सुरक्षेला गालबोट लावणाऱ्या अशा नराधमाला जन्मभर कारागृहात सडवले पाहिजे," अशी मागणी गावकऱ्यांकडून होत आहे.चौलमध्ये या घटनेनंतर पालकांमध्ये भीतीचे वातावरण असून, परिसरातील नागरिक न्याय मिळेपर्यंत ठाम राहण्याचा निर्धार व्यक्त करत आहेत.

# डोंगरगाव येथे अवैध कत्तलखाना उध्वस्त

## चार जणांच्या विरोधात गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

सिल्लोड शहराजवळून जवळच असलेल्या डोंगरगाव येथे सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकाने रविवार रोजी पहाटेच्या सुमारास अवैध कत्तलखान्यावर कारवाई करून मोठ्या प्रमाणात गाईचे एक क्विंटलहून अधिक गोमांस व कत्तल करण्यासाठी आणलेल्या जिवंत गाई ताब्यात घेतल्या. याप्रकरणी चार जणांच्या विरोधात सिल्लोड ग्रामीण पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सिल्लोड,फुलंब्री,कन्नड, सोयगाव या तालुक्यातून मागील काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांची जनावरे चोरी जात असल्याने शेतकरी या जनावर चोरांपासून त्रस्त झाले आहेत. या जनावर चोरीबाबत अनेक पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल असल्या तरी हे जनावर चोर पोलिसांना सापडत नाहीत.याबाबत अनेक शेतकऱ्यांनी आपली जनावरे चोरल्यावर मोठ्या प्रमाणात कत्तलखान्यात नेली जात असल्याची संशय व्यक्त केले होते. रविवार (दि२१) रोजी पहाटे तीन वाजेच्या सुमारास सिल्लोड ग्रामीण पोलिसांना गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र ठाकरे, फौजदार लहू घोडे, पोलीस हेडकॉन्स्टेबल सतीश पाटील, संजय आगे यांच्या पथकाने सिल्लोड शहराजवळ असलेल्या डोंगरगाव येथे सुरू असलेल्या अवैध कत्तलखान्यावर धाड टाकली. पोलीस येतात अवैध कत्तलखाना चालवणारे पळून जाण्यात यशस्वी झाले. या ठिकाणी पोलिसांनी पाहणी केली असता त्यांना मोठा धक्का बसला. दोन जिवंत गाई एक नुकतीच कापलेली गाय,सुरे,कुऱ्हाड,लोखंडी तराजू,माप, मांस कटाई साठी वापरत असलेले दोन लाकडी ठोकळे, व मोठ्या प्रमाणात कापून ठेवण्यात आलेले एक क्विंटलहुन अधिक सव्वा दोन लाख रुपयाचे गोमांस पोलिसांनी जप्त केले आहे.

सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक सतिष नाना पाटील यांनी दिलेल्या तक्रारीवरून

गोमांस विक्री करणारे आरोपी अन्सार कुरेशी, इलियास कुरेशी,गालिब कुरेशी,लादेन कुरेशी सर्व रा. डोगरगांव ता. सिल्लोड या चार जणांच्या विरोधात गोमांस प्रतिबंधक कायदा व इतर विविध कलमान्वये सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लहू घोडे हे करीत आहेत.

* दोन दिवसांपूर्वी शहर पोलिसांच्या पदरी निराशा.*

शनिवार रोजी शहर पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांना सिल्लोड शहरातील स्नेहनगर भागातील ईदगाह परिसरात अशाच प्रकारचे अवैधरित्या गोमांस साठवून ठेवले असून या परिसरात मोठ्या प्रमाणात गायींची कत्तल होत असल्याबाबतची गुप्त बातमी दाराकडून माहिती मिळाली होती. या परिसरातही शनिवारी पहाटे तीन ते सकाळच्या सात वाजेपर्यंत पोलिसांनी सर्च ऑपरेशन राबविले परंतु या ठिकाणाहून सदरील गोमांस विक्री करणारे तस्कर पोलिसांच्या हातावर तुरी देण्यात यशस्वी झाले.

# खारघरमध्ये पुन्हा सोनेरी कोल्ह्याचे दर्शन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

खारघर येथे सोनेरी कोल्हा आणि भटके कुत्रे एकत्र वावरत असल्याचे व्हिडीओ यापूर्वी प्रसिद्ध झाले होते. त्यामुळे सोनेरी कोल्ह्यांचा अधिवास आणि संरक्षणाचा मुद्दा त्यावेळी ऐरणीवर आला होता. आता पुन्हा एकदा खारघर वसाहतीत भटक्या कुत्र्यांसोबत फिरणारी सोनेरी कोल्ह्याची जोडी दिसून आली असून सामाजिक कार्यकर्ते दीपक सिंग यांनी आपल्या मोबाईलमध्ये सोनेरे कोल्ह्यांची जोडी कैद केली आहे. झपट्याने विकसित होत असलेल्या खारघर वसाहती शेजारी असलेल्या डोंगर रांगांमध्ये मोठ्या प्रमाणात जैवविविधता अस्तित्वात असून, विविध प्रकारचे पशु आणि पक्षी या ठिकाणी वास्तव्यास आहेत. विकासासाठी होत असलेल्या कामांमुळे मोठ्या



प्रमाणात वृक्षतोड केली जात असल्याने या ठिकाणची जैवविविधता धोक्यात आली आहे. अशातच या ठिकाणी वास्तव्यास असलेले जंगली प्राणी आता अन्नाच्या शोधात मानवी वस्तीत घुसखोरी करू लागले आहेत. खारघर शहरालगतच्या खाडी किनारी भागात मागील काही महिन्यात सोनेरी कोल्ह्यांचा मुक्त संचार वाढला आहे. खारघरमधील वास्तुविहार सोसायटीच्या मागील बाजूस खाडी किनारी भागात दोन सोनेरी कोल्हे या पूर्वी आढलेले होते. गेल्या तीन-चार वर्षांपासून नवी मुंबईतील सेंट्रल पार्कमध्ये पाणथळ, खाडीकिनारा भागात खुलेआम वाढला आहे. काही दिवसांपूर्वी खारखरमधील सेक्टर १५ मधील रस्त्यावर सोनेरी कोल्हा मृतावस्थेत आढळला होता. मागील काही वर्षांत देखील कोल्ह्यांचे मृतदेह कुजलेल्या अवस्थेत पाहायला मिळाले होते.

# गोवंश तस्करी करणारा आयशर ट्रक पोलिसांच्या ताब्यात

## वडकी पोलिसांची धडक कारवाई ; २२ लाखाचा मुद्देमाल जप्त

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:- जितेंद्र खोडे**

धडकी:-राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरून नागपूर कडून हैद्राबाद कडे आयशर ट्रक वाहनातून गोवंश जनावरांची बैल घेवून जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली असता आयशर ट्रक जप्त करून जनावरांची सुटका केली असून २२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे ही कारवाई वडकी पोलिसांनी दि.२१ सप्टेंबर २०२५ रोजी देवधरी घाटात रात्री १:३० वाजताच्या दरम्यान केली आहे.नागपुर कडुन हैद्राबाद कडे एम एच ४० सी टी २५०३ या आयशर वाहनातून आठ बैल कत्तली करीता वाहतुक करून घेऊन जात असल्याबाबत गोपनिय माहीती पोलिसांना मिळाली या माहितीच्या आधारे वडकी हद्दीतील देवधरी घाटात वडकी पोलिसांनी पोलिस कर्मचाऱ्यांसह सापळा रचुन सदर वाहन थांबवून वाहनाची तपासणी केले असता त्यात ८ नग बैल जातीचे दिसून आले असून प्रत्येकी किंमत




२५०००/-रू प्रमाणे एकुन २ लाख रुपये आणि २० लाख रूपये आयशर ट्रक वाहन असा एकुण २२ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपी नामे मोहसिन खान मुजफ्फर खान वय २८ वर्षे रा. चंगेरा ता.जि. गोंदीया, आयान सय्यद हमीद सय्यद वय २१ वर्षे रा. राजेगांव ता.जि.गोंदीया यांचे ताब्यातुन मिळुन आला आहे.त्यांना सदर बैल कोणाचे आहेत याबाबत विचारणा केली असता त्यांनी ती अब्दुल अजीज शेख,रा. नागपुर यांचे असल्याबाबत सांगीतले वरून पोलिस स्टेशनला महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम ५५ (अ) ५ (ब) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन सदरची कार्यवाही मा.जिल्हा पोलीस अधिक्षक कुमार चिंता अपर पोलीस अधिक्षक श्री. अशोक थोरात,पोलीस अधिकक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी पांढरकवडा रॉबीन बंन्सल यांचे मार्गदर्शनात वडकी पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुखदेव भोरकडे, पोलीस अंमलदार रमेश आत्राम,भोजराज करपते,अमोल चौधरी,अरविंद चव्हाण,विनोद मोतेराव,चालक दिपक मडकाम यांनी पार पाडली.

# अखिल भारतीय ध्रुवतारा अपंग क्रांतीकारी सामाजिक संघटनेच्या मोहाळी तालुका अध्यक्षपदी प्रविण जावळकर यांची नियुक्ती.



**दैनिक युवक आधार**

**भंडारा :-** प्राप्त माहिती अनुसार मोहाळी तालुक्यातील ग्राम जाबं येथील सामाजिक कार्यकर्ते व ग्रामपंचायत चे माजी शिक्षण सभापती प्रविण जावळकर यांची नियुक्ती अखिल "भारतीय ध्रुवतारा अपंग क्रांतीकारी सामाजिक संघटना" (संपूर्ण भारत) च्या मोहाळी तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. ही नियुक्ती "अखिल भारतीय ध्रुवतारा अपंग क्रांतीकारी सामाजिक संघटने" चे संस्थापक सचिव श्रीकृष्ण देशभ्रतार व "अखिल भारतीय ध्रुवतारा अपंग क्रांतीकारी सामाजिक संघटने "चे राष्ट्रीय अध्यक्ष संजीव भांबोरे यांनी लेखी-पत्र व शाल श्रीफळ देऊन नियुक्ती केलेली आहे. प्रविण जावळकर हे दिव्यांग सामाजिक चळवळीत सक्रिय कार्यकर्ता असून .त्यांनी तालुक्यातीलशाळा शिक्षण समितीवर असताना विद्यार्थी, शिक्षकांच्या समस्या मार्गी लावून माझी शाळा सुंदर कशी होईल हे ग्रामवासीयांना लक्षवेधी काम केले.व तालुक्यातील लोकांच्या अनेक समस्या शासनापुढे निवारण करण्याचे प्रयत्न करत, त्यांनी दिव्यांगाच्या तालुक्या स्तरावर अनेक कार्यक्रम घेऊन समस्या मार्गी लावण्याचे कार्य केले. त्यांच्या निवडीचे संपूर्ण तालुक्यात होत,असून त्यांना निवडीचे पुढच्या वाटचालीसाठी नियुक्तीपत्र देऊन शाल श्रीफळ सत्कार करण्यात आला.

उपस्थितांमध्ये संघटनेचे संस्थापक सचिव समाजसेवक श्रीकृष्ण देशभ्रतार, मोहाळी तालुका अध्यक्ष प्रवीण जावळकर, सामाजिक कार्यकर्ता दिलीप बुर्डे, साप्ताहिक जनता की आवाज चे टेलिग्राफर हर्षवर्धन देशभ्रतार, तर सामाजिक कार्यकर्त्या व संघटनेच्या.राष्ट्रीय अध्यक्षिका मंजुषा देशभ्रतार,प्रमोद बेलेकर,ज्येष्ठ पत्रकार दिगंबर देशभ्रतार,सतीश जीवतोडे इतर अनेक संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.अभिनंदन व शुभेच्छा दिल्या .

# अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण कृती समितीची व्यापक बैठक संपन्न !!

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

29 सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर शहरातील ऐतिहासिक क्रांती चौकात "भव्य निदर्शने" करण्याचा एकमुखाने निर्णय !

आज सोमवार दि.22 सप्टेंबर रोजी अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण समितीच्या वतीने समाजातील सर्वपक्षीय नेत्यांची व समाजातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांची आढावा बैठक मोठ्या उत्साहात संपन्न झाली. व या बैठकीत येणाऱ्या सोमवारी दि.29 सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर शहरातील ऐतिहासिक क्रांती चौकात सकाळी 11:00 वाजता अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी "भव्य निदर्शने" करण्याचा एकमुखी निर्णय घेतला



गेला. व त्यासाठी काय-काय उपाययोजना करता येईल, त्याचे नियोजन कसे असले पाहिजे, छत्रपती संभाजीनगर शहरासहित जिल्ह्यातील ग्रामीण भागातून समाजातील समाजबांधवांची व भगिनींची संख्या कशी वाढवता येईल, आर्थिक नियोजन कसे करता येईल आदी विविध विषयांवर चर्चा करण्यांत आली व यांपैकी काही विषयांवर शिक्कामोर्तब देखील करण्यांत आले. व्यापक स्वरुपात झालेल्या आजच्या या बैठकीत उपस्थित झालेल्या सर्वांनीच आपल्या परिवारासहित, संपर्कातील व नातेवाईकांची जनसंख्या कशी वाढवता येईल असा शब्द दिला. काहींनी मोफत पाणी वाटप, तर काहींनी रिक्षा द्वारे प्रचार आणि जनजागृती करण्याचीही ग्वाही दिली.... उपस्थित प्रत्येकाने आपापले मत व्यक्त केले व "भव्य निदर्शने" व्यापक स्वरुपात कसे होईल यांसाठी मार्गदर्शन केले. याप्रसंगी या आढावा बैठकीसाठी ज्येष्ठ नेते उत्तमरावजी कांबळे, माजी नगरसेवक राजु आहिरे, नगरसेवक विजय (गुड्डू) निकाळजे, प्रा. संजय गायकवाड, नगरसेवक सुनिल नाडे, पं.स.सदस्य सुभाष भालेराव,किशोर दणके, संदिप मानकर, उत्तम दणके, विनोद साबळे, राजु खाजेकर, योगेश दणके, संतोष पवार, सुनील आण्णा मोटे, मारोती तुपे, बिशोप देवकाते, बिशोप प्रविण बोरगे, बिशोप शेकनाथ भालेराव, यादवराव आहिरे, सुभाष मानवतकर, विलास खोतकर, किशोर गायकवाड, माऊली निकाळजे, स्वप्नील दाभाडे, रमेश आहिरे, गंगेश आघाम, विशाल जाधव, प्रकाश भाले, प्रमोद आहिरे, प्रकाश श्रीसुंदर, कचरु भालेराव, राजेंद्र क्षीरसागर, विजय आहिरे, गजानन पंडितराव कांबळे, अजय चौतमल, आनंद नाडे, ऍड. सुभाष नाडे, ऍड.डी.बी.गायकवाड, पुरुषोत्तम अस्वले, किशोर तुपे, राम आव्हाड, राजेंद्र नवगिरे, गजानन कांबळे, राजश्रीताई साठे, संगिताताई सरोदे, मारिया साठे, सुजाता गवळे, मंगेश सकट, गणेश निकाळजे, सोनू मरसाळे, भागवत रणबावळे, योगेश आहिरे, राजु भालेराव, सुभाष पाचूंदे, जॉन आव्हाड, यशराज इंचाळकर, दिपक थोरात, दिपक अंबिलढगे, सचिन इंचाळकर, दिपक बाजड, प्रविण शिंदे, अजय रोकडे, विक्की लोखंडे, आनंद भाले, नागेश बत्तीशे, डॉ.नागेश गायकवाड, वसंत नाडे, ऋषिकेश नाडे, शंकर साठे, सोमीनाथ कसारे, अशोक आव्हाड आदीं समाज बांधवांची व भगिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती..!!

# धनगर समाजाचे एसटी आरक्षण अमलबजावणीसाठी निवेदन.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रिसोड. रणजितसिह. ठाकूर**

दिनांक 22/09/2025 रोजी सकल धनगर समाजाच्या वतीने तहसील कार्याल रिसोड येथे धनगर" एसटी ( ST)"आरक्षण अंबलबजावणीसाठी निवेदन देण्यात आले धनगर समाजाचा तब्बल या आरक्षणाच्या मागणीसाठी 75 वर्ष झाले लढा चालू आहे..

तरी आमचे बांधव दीपक बोऱ्हाडे जालना येथे उपोषणाला बसले असून उपोषणाला पाच दिवस झाले. अजून प्रशासनाने दखल घेतली नसून धनगर समाज लवकरच रस्त्यावर उतरेल अशी मागणी रिसोड तालुक्यातील सकल धनगर समाजाच्या वतीने केली तरी सरकारला आमची एकच विनंती आहे आमच्या धनगर एसटी आरक्षण मागणीचा यशस्वीरित्या प्रयत्न करावे..

अन्यथा संपूर्ण महाराष्ट्रातला धनगर समाज आम्ही रस्त्यावर उतरवून सरकारच्या छाताडावर बसून आमची मागणी पूर्ण करून घेऊ.. यावेळी रिसोड तालुक्यातील बहुसंख्य धनगर समाज बांधव रिसोड तहसीलदार यांना निवेदन देण्यासाठी दाखल झाले होते यापुढे महाराष्ट्रभर धनगर समाज बांधवांचा एसटी प्रवर्गामध्ये समावेशासाठी



आंदोलन लढा चालू राहणार असल्याने सदर बाबीकडे शासनाने तात्काळ लक्ष घालावे अन्यथा हे आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल असा धनगर समाज रिसोड तालुका पदाधिकाऱ्यांच्या वतीने प्रशासनाला इशारा देण्यात आला आहे

# सुधाभाऊ यांच्या भव्य दिव्य सन्मान नियोजनाला खासदार सुनील तटकरेंचा मानाचा मुजरा .

## पक्ष प्रवेश यावेळी माझ्यासाठी महत्वपूर्ण भेट... तटकरे

**दैनिक युवक आधार**
**कर्जत:वार्ताहर**
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आणि रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी लंडनमध्ये झालेल्या ‘लोकमत ग्लोबल इकॉनॉमिक कन्व्हेन्शन’ मध्ये ‘भारत भूषण’ हा जागतिक सन्मान प्राप्त करून आपल्या जिल्ह्याचा गौरव उंचावला आहे यानिमित्ताने सौ. वरदा आणि सुनील दत्तात्रेय तटकरे या दाम्पत्यांचा यांचा भव्य नागरी सत्कार सोहळा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने (दि.२१ सप्टेंबर) रोजी पोलीस मैदान, कर्जत येथे मोठ्या उत्साहात पार पडला.
या भव्य नागरी सत्कार सोहळा निमित्ताने शिवसेना शिंदे गटाचे डॉ. सुनील पाटील, भाजपा नेत्या रायगड जिल्हा महिला मोर्चा अध्यक्ष अश्विनी पाटील,माजी नगरसेविका अनिता शाह , भाजपा शहर अध्यक्ष राहुल जाधव, अल्पसंख्याक नेत्या सौ.जुबेनिसा अदमद शेख सह अनेक कार्यकर्त्यांचा पक्ष प्रवेश झाला .
सुधाकर घारे यांनी सर्व पितृ अमावस्या या निमित्ताने कर्जत मधील काही भूतांना आमचा जादूगर किती मोठा आहे हे दाखवायचे होते असे सांगितले ,तर कर्जतच्या सर्व व्यापाऱ्यांच्या उपस्थितीचे कारण तटकरे साहेबांच्या माध्यमातून झालेला मुख्य बाजारपेठेतील रस्ता असेही भाषणातून उल्लेख केले आगामी काळात ज्यांनी ज्यांनी माझ्यावर विश्वास ठेवून पक्षात प्रवेश केला त्यांना सर्वांना सोबत घेऊन खोपोली, माथेरान ,कर्जत व जिल्ह्यातील अनेक स्थानिक स्वराज्य संस्था राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या हातात येतील असा विश्वास या निमित्ताने घारे यांनी व्यक्त केला. व पक्षप्रवेश करणाऱ्या सर्वांचे आभार



मानले हीच ताकद मला विधानसभेत भेटली असती तर मी विजयी झालो असतो अशी ही खंत त्यांनी व्यक्त केली.
पक्षाचे वरिष्ठ नेते प्रफुल पटेल व व्यासपीठावरील सर्व नेत्यांनी मिळून सुधाकर घारे यांच्या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा झेंडा फडकेल यासाठी सर्व परीने मदत करून असा विश्वास व्यासपीठावरून व्यक्त केला.
लय बोलतो स्वाभिमानी आहे आमदार असे मिश्किल वक्तव्य आमदार सुनील शेळके यांनी करत पळत नसाल तर राजीनामा देऊन निवडणूक लढवा असा उल्लेख महायुती मधील कर्जत मतदारसंघातील आमदार यांना टोला देत केला.
आमदार धनंजय मुंडे यांनी आमची चूक कान धरून समजून आम्हालाही जास्त वेळ मोकळे ठेवू नका अशी मागणी व्यासपीठाच्या माध्यमातून प्रदेशाध्यक्ष तटकरे यांच्याकडे केली व सुनील तटकरे यांच्या राजकीय कर्तृत्वाबद्दल गौरव उद्‌गार व्यक्त केले.
खासदार सुनील तटकरे यांनी भव्य दिव्य अशा सोहळ्याच्या आयोजनाचे कौतुक करून सुधा भाऊ आपणास मानाचा मुजरा असे सांगत . आपण जे पक्षाच्या वतीने सन्मान दिले ते अविस्मरणीय राहील असे सांगत माझ्यासाठी आज भेट म्हणून झालेला पक्षप्रवेश महत्त्वाचा आहे असे उल्लेख ही करताना दिसले. आगामी काळात सुधाकर घारे माझ्यासारखे व अंतुले साहेबांसारखे पराभव होऊन परत महाराष्ट्राच्या राजकारणात महत्त्वपूर्ण नेता म्हणून दिसतील अशा शुभेच्छा ही घारे यांना दिल्या.
राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष म्हणून नियुक्तीपत्र घेतलेल्या डॉ. सुनील पाटील व स्वगृही परतलेल्या आश्विनीताई पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सदस्यत्व पद स्वीकारत उपस्थित सर्व पक्षश्रेष्ठींचे व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि राष्ट्रीय नेते उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचेही आभार मानले.
या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा राज्यसभा खासदार प्रफुल्ल पटेल, माजी मंत्री तथा आमदार परळी वैजनाथ धनंजय मुंडे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, राष्ट्रवादी महिला काँग्रेस प्रदेशाध्यक्षा, रुपाली चाकणकर, मावळ विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुनील अण्णा शेळके, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख प्रवक्ते आनंद परांजपे, माजी आमदार अनिकेत तटकरे, मुश्ताक अंतुले, माजी आमदार तुकाराम सुर्वे, जेष्ठ नेते दत्तात्रयजी मसुरकर, प्रविण ठाकूर, माजी महाड नगराध्यक्षा स्नेहल जगताप यांसह रायगड जिल्ह्यातील अनेक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## पुणे शाहू चॅरिटेबल वेल्फेअर असोसिएशनच्या छत्रपती संभाजी नगर जिल्हा अध्यक्षपदी सतीश लोखंडे

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रतिनिधी.**
फुले शाहू चॅरिटेबल व वेल्फेअर असोसिएशन (एनजीओ) या राज्यस्तरीय शासकीय नोंदणीकृत ट्रस्टच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष पदी पत्रकार सतिश लोखंडे यांची निवड झाली आहे. मुंबई येथे शुक्रवारी १२ सप्टेंबर रोजी संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.विजय हिगोले यांनी हि घोषणा केली . महाराष्ट्र शासन मान्य प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाचे जिल्हा अध्यक्ष व सामाजिक , राजकीय , शैक्षणिक , क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेले . सतिश लोखंडे यांचे नाव राज्य सरचिटणीस मा. संजीव भांबोरे यांनी सुचविले म्हणून हि निवड केली गेली . संस्थेचे विविध उपक्रमात आरोग्य सुविधा , औषध पुरवठा , दिव्यांगांना कृत्रिम अवयव , युवकांना रोजगाराची संधी , उपलब्ध करून देणे , विधवा व तृतीय पंथाना व्यवसाय



भांडवल साठी मदत , शेतकऱ्यांना कृषी साहित्य व चालकांना वाहन खरेदी साठी मदत , अपघात विमा , तसेच खेळाडूंना प्रशिक्षण , अशा अनेक उपक्रमांचा समावेश आहे. नियुक्ती नंतर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात गोरगरीब व विधवा महिलां , बेरोजगार युवक , दिव्यांग , आणि शेतकऱ्यांसाठी , फाउंडेशनच्या माध्यमातून योजनांचा लाभ जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात मिळवून देण्यासाठी प्राधान्य क्रम संस्थेच्या माध्यमातून केले जाईल . निवड झाल्या बद्दल जिल्ह्यातील पत्रकार व सामाजिक राजकीय शैक्षणिक क्षेत्रातून सोशल व मीडिया च्या माध्यमातून मित्र मंडळाकडून शुभेच्छांचा वर्षाव व अभिनंदन होत आहे.

## धानोरा येथे युनिक आय ऑप्टिकल तर्फे मोफत डोळे तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**
**राळेगाव:-** तालुक्यातील धानोरा येथे युनिक आय ऑप्टिकल यांच्या तर्फे २१ सप्टेंबर २०२५ रोजी ग्रामपंचायत कार्यालयात मोफत डोळे तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात तज्ञांनी अत्याधुनिक मशीनद्वारे नागरिकांची तपासणी केली.गावातील मोठ्या संख्येने नागरिकांनी शिबिराचा लाभ घेतला. तपासणीनंतर गरजूंना कमी दरात चष्मे उपलब्ध करून देण्यात आले. सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून गावकऱ्यांना दिलेल्या या मदतीबद्दल नागरिकांनी युनिक आय ऑप्टिकलच्या कार्याचे कौतुक केले.
या शिबिरासाठी डॉ.दर्शना मॅडम व मिथुन सर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच गावातील युवा कार्यकर्ते प्रणय मुडे,स्वप्नील भोयर,शशांक देवतळे, विशाल घोडे,यश भोयर व मित्र परिवार यांनी विशेष सहकार्य केले.





---

# नवरात्रीचा गिफ्ट मनसेच्या प्रयत्नाने आग्राव-बोरिवली बस सेवा सुरू

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**
मनसेच्या झंझावाती पाठपुराव्याला यश, जनतेचा आवाज ठरली मनसे चौल-आग्रावकरांचा प्रवाससुख परतला.कोरोना काळापासून बंद असलेली आग्राव-बोरिवली एसटी सेवा पुन्हा मार्गावरअलिबाग तालुक्यातील जनतेच्या हालअपेष्टांकडे सरकारने डोळेझाक केली होती. कोरोना काळापासून ठप्प झालेली आग्राव-बोरिवली एसटी सेवा बंद असल्याने चौल-आग्रावसह नागाव, अलिबाग




परिसरातील प्रवाशांचे हाल झाले होते. शाळकरी विद्यार्थी, नोकरीला जाणारे प्रवासी यांची प्रचंड तारांबळ उडाली होती.पण जनतेसाठी नेहमीच लढणारी महाराष्ट्र नवनिर्माण सेना मैदानात उतरली आणि आज नवरात्रीच्या शुभमुहूर्तावर ही बस सेवा पुन्हा सुरू करून दाखवली.यावेळी रायगड जिल्हाध्यक्ष श्री जितु पाटील, उपजिल्हाध्यक्ष श्री शैलेश खोत, तालुका अध्यक्ष श्री सिद्धू म्हात्रे, रा.प. का.सेना तालुका अध्यक्ष अमित अनिल कंटक, श्री संकेत पाटील, दिलीप पालवणकर यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित राहून जनतेचा विजय साजरा केला. मनसे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले “फक्त आग्रावच नाही, तर अलिबाग तालुक्यातील इतर गावांतून बंद असलेल्या मुंबई-बोरिवली एसटी सेवा पुन्हा सुरू करण्यासाठीही आमचा लढा सुरू राहील. जनतेच्या हक्कासाठी मनसे नेहमीच रस्त्यावर उतरेल!”ग्रामस्थांनी जल्लोष करत मनसेच्या कार्यकर्त्यांचा सत्कार केला. अनेकांनी हक्काचा आवाज बुलंद करणाऱ्या मनसेला खऱ्या अर्थाने गरीब-जनतेचा आधार म्हटलं.आजच्या या निर्णयामुळे गावात समाधान, आनंद आणि मनसेवरील विश्वास दुणावला आहे.

## जपान दौऱ्यावर आलेल्या पालकमंत्री श्री उदय सामंत यांचे कोंडगे गावच्या सुनबाई सौ. गायत्री कदम यांनी केले औक्षण

**दैनिक युवक आधार**
**मुंबई:- (प्रमोद तरळ)**
रत्नागिरी जिल्ह्याचे लाडके पालकमंत्री आणि महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री मा.ना. उदयजी सामंत जपान दौऱ्यावर असून त्यांचे औक्षण जपानमध्ये स्थायिक असलेल्या सौ. गायत्री स्वप्नील कदम यांना मिळाला

उद्योगमंत्री उदयजी सामंत सध्या कंपन्यांना भेटी देण्यासाठी जपान दौऱ्यावर गेले आहेत. लांजा तालुक्यातील मौजे कोंडगे गावचे उच्च शिक्षित असलेले सुपुत्र स्वप्निल कदम हे आयटी इंजिनियर्स असून आपल्या कुटुंबासह जपान येथे स्थायिक आहेत. यावेळी सौ. गायत्री यांनी ना.सामंत यांचे औक्षण करण्याचे



भाग्य लाभले मंत्रीमहोदयानी सुध्दा त्यांची आस्थेने विचारपूस करुन या दाम्पत्याचे कौतुक केले सौ. गायत्री या कोंडगे गावचे विद्यमान सरपंच डॉ सिताराम कदम यांच्या सुनबाई आहेत.

---

# दिबा पाटील यांच्या नावासाठी पनवेलचे पत्रकार उतरणार मैदानात

### पनवेल तालुका पत्रकार एकत्रीकरण संस्था करणार धरणे आंदोलन, सिडकोसह पोलीस प्रशासनाला दिले निवेदन*








**दैनिक युवक आधार**
**पनवेल : राज भंडारी**
नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उदघाटनासाठी काही दिवस शिल्लक राहीले असताना अद्याप विमानतळाच्या नामकरणाची अधिकृतपणे घोषणा केंद्र सरकारने केली नाही. परंतू प्रकल्पग्रस्तांनी दैवत मानलेल्या दि. बा. पाटील यांचे नाव विमानतळाला दिले जावे या मागणीसाठी पनवेल तालुका पत्रकार एकत्रीकरण संस्थेच्यावतीने येत्या २६ सप्टेंबर रोजी सिडको कार्यालयाबाहेर धरणे आंदोलन करण्याचा इशारा देणारे निवेदन सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख तसेच बेलापूर सीबीडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण पवार यांना सोमवारी देण्यात आले. रायगड व ठाणे जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांची आक्रमक भूमिका आणि जिव्हाळ्याच्या या विषयावर राज्य सरकारने सुद्धा पाठिंबा दर्शवत केंद्र सरकारकडे मंत्रिमंडळाचा ठराव घेऊन दि. बा. पाटील यांच्या नावाचा प्रस्ताव पाठवला आहे. मात्र या विमानतळाच्या उदघाटनाच्या वावड्या उठू लागल्या तरी केंद्र शासनामार्फत दिबांच्या नावाची अधिकृत घोषणा अद्यापही करण्यात आली नाही. हे आंतरराष्ट्रीय विमानतळ पनवेल तालुक्यात उभे राहिले आहे. त्यामुळे येथील जनतेने विकासाच्या दृष्टीने आपली कसत असलेली जमीन विमानतळाला दिली. प्रकल्पग्रस्तांच्यावतीने विकासात कोणताही अडसर आणण्यात आला नाही, त्यामुळे विमानतळाला स्व. लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नाव केंद्र शासनाने जाहीर करावे यासाठी पनवेल तालुका पत्रकार एकत्रीकरण संस्थेच्यावतीने येत्या २६ सप्टेंबर रोजी सिडको कार्यालयाबाहेर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. यावेळी पनवेल तालुका पत्रकार एकत्रीकरण संस्थेच्यावतीने जेष्ठ पत्रकार विजय कडू, जेष्ठ पत्रकार सय्यद अकबर, निलेश सोनावणे, विवेक पाटील, संजय कदम, केवल महाडिक, राज भंडारी, विशाल सावंत, सनीप कलोते, लालचंद यादव, आण्णासाहेब अहेर, चंद्रकांत शिर्के, महिला पदाधिकारी रुपाली शिंदे, दीपाली पारसकर आदी उपस्थित होते.